# मुंबई इलाख्याचें

# ग्याझेटिअर.

## पुस्तक २४.

# कोल्हापूर.

याचें

मराठी भाषांतर

कोल्हापूर कौन्सिल आफ अडमिनिस्ट्रेशन यांच्या हुकुमावरून

बाळाजी प्रभाकर मोडक,
राजाराम कालेज, कोल्हापूर
यांणीं केलें.

कोल्हापूर येथें:
करवीर सरकारचे छापखान्यांत छापिलें.

इ. स. १८९०.

हवा, रोग, धामी, दवाखाने, मुलांचे गृह, देवी काढणें, गुरांचे रोग. ... ४३.
जनन व मृत्यु .... .... .... .... .... .... .... ४१९-४३६
प्रकरण १२—महत्वाचीं स्थळें .... .... .... .... .... ४३६-४८६
सांगली.—
साधारण वर्णन, उत्पन्न, लोक, शेती .... .... .... .... ४८७-५०६
भांडवल, व्यापार, धंदे .... .... .... .... .... .... ५०६-५१९
इतिहास, जमीन .... .... .... .... .... .... .... ५१९-५३६
न्याय, वसूल, शिक्षण, आरोग्य व रोगराई .... .... .... .... ५३७-५४३
महत्वाचीं स्थळें .... .... .... .... .... .... .... ५४४-५७२
मिरज .... .... .... .... .... .... .... .... .... ५७२-५८०
कुरुंदवाड .... .... .... .... .... .... .... .... ५८०-५८३
जमखंडी .... .... .... .... .... .... .... .... .... ५८३-५८७
मुधोळ .... .... .... .... .... .... .... .... .... ५८७-५९८
रामदुर्ग .... .... .... .... .... .... .... .... .... ५९८-६०४
परिशिष्ट (अ) उष्णमानें व पर्जन्य वृष्टि.... .... .... .... .... ६०५-६१०
परिशिष्ट (ब) झाडें व औषधोपयोगी वनस्पति .... .... .... .... ६११-६२५
परिशिष्ट (क) मराठ्यांचीं आडनांवें .... .... .... .... .... ६२६-६२७
परिशिष्ट (ड) भूतपिशाच बाधा .... .... .... .... .... ६२८-६४४
सूचिपत्र .... .... .... .... .... .... .... .... .... ६४५-६६०

# ग्रंथकाराची मूळ प्रस्तावना

रावबहादूर यशवंत मोरेश्वर केळकर आणि लेफ्टनंट कर्नल वालर साहेब या उभयतांचा मी विशेष आभारी आहे.

लेफ्टनंट कर्नल रीव्हज साहेब, कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट, रावबहादूर महादेव वासुदेव बर्वे, सी.आय्.ई., कोल्हापूरचे दिवाण, डाक्टर सिंक्लेअर साहेब, राव-बहादूर बळवंत नारायण जोशी, रा० रा० बळवंत भिकाजी वखारकर, काशिनाथ गणेश केळकर, अण्णाजी व्यंकटराव आणि लक्ष्मण रामचंद्र गोळवलकर यांजपासूनही पुष्कळ मदत मिळाली.

(सही) जेम्स. एम. क्यांपबेल.

---

भाषांतरकाराची सूचना—कोल्हापूरचे राज्य व कर्नाटक प्रांतांतील संस्थानें यांतील अमलदार व इतर लोक यांच्या उपयोगाकरितां कोल्हापूर सरकारच्या हुकुमा-वरून हें भाषांतर केलें आहे. मूळ इंग्रजी ग्रंथांतील सर्व भाग यांत आला आहे. फक्त क्वचित् ठिकाणीं मराठी वाचकांस उपयोगी न पडण्याजोग्या अशा टिपा मात्र गाळल्या आहेत. भाषांतर लिहिण्याचे कामीं व प्रूफ तपासण्याचे कामीं वगैरे रा० रा० दिनकर वासुदेव गोखले, कारकून निसबत श्री० सरलष्कर यांचें फार सहाय्य झालें, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

# अनुक्रमणिका.

## कोल्हापूर.


प्रकरण १—वर्णन.

| | पृष्ठ. |
|---|---|
| साधारण वर्णन, प्रांताचे विभाग, सीमा, स्वरूप, बहिर्वर्ती प्रदेश, कोंकणघाटमाथा, देश .... .... .... .... .... .... | १-६ |
| डोंगर, नद्या, विहिरी, तळीं .... .... .... .... .... | ६-१८ |
| भूस्तरविषयक माहिती, हवा, पर्जन्य, उष्णमान .... .... .... | १८-२६ |

प्रकरण २—उत्पन्न.

| | |
|---|---|
| खनिज पदार्थ, जंगलें.... .... .... .... .... .... .... | २६-३७ |
| पाळीव जनावरें, रानटी जनावरें, सर्प, मासे .... .... .... | ३७-४९ |

प्रकरण ३—लोक.

| | |
|---|---|
| खानेसुमारीची माहिती, घरें, खेडीं, खेड्यांतील हक्कदार, फिरते लोक. | ५०-६४ |
| हिंदू— | |
| ब्राह्मण .... .... .... .... .... .... .... .... | ६४-९४ |
| मराठे व रजपूत .... .... .... .... .... .... .... | ९४-१२० |
| उदमी, शेतकरी, कसबी, वाजंत्री, चाकर, धनगर .... .... .... | १२०-१४७ |
| मजूर, स्थाईक न राहणारे, हलक्या जाती, भिक्षेकरी .... | १४८-१७० |
| लिंगाईत .... .... .... .... .... .... .... .... | १७०-१९१ |
| जैन .... .... .... .... .... .... .... .... | १९१-२१० |
| मुसलमीन, ख्रिस्ती, बौद्ध, यहुदी, पारशी .... .... .... .... | २१०-२१९ |

प्रकरण ४—शेतकी.

| | |
|---|---|
| शेतकरी, पिकें, जमीन, लागवड जमीन, खातीं, शेतीचीं आउतें .... | २२०-२३० |
| नांगरणें, पेरणें, खतें, पाणी पाजणें, भांगलणें, मळणें, झडपणें, मिश्रधान्यें पेरणें, कुमरी लागवड, फेरपाळीनें पिकें घेणें, पड टाकणें. | २३०-२३७ |
| पिकांचा तपशील .... .... .... .... .... .... .... | २३७-२७२ |
| पिकांस होणारे रोग, टोळ .... .... .... .... .... .... | २७२-२७३ |
| दुष्काळ .... .... .... .... .... .... .... .... | २७३-२७८ |

प्रकरण ५—भांडवल.

| | |
|---|---|
| सावकार, नाणें, विमा, हुंड्या, शिल्लक टाकणारे लोक, व्याज, कर्ज काढणारे, गहाणें, मजुरीचे दर, वजनें व मापें, बाजारभाव .... | २७९-२८९ |

प्रकरण ६—व्यापार व धंदे.

रस्ते, दस्तुऱ्या, आगगाडी, घाट, तरी व नावा, पूल, धर्मशाळा, टपाल आफिसें, तार आफिसें, व्यापाराचीं ठिकाणें, जत्रा, दुकानदार, फिरते व्यापारी, माल आणणारे व नेणारे थळभरीत आणि थळमोड माल .... .... .... .... .... .... .... २८९-३०३

धंदे.—

सोन्यारुप्याचें काम, तांबट व कासार, लोहार, पाथरवट, लोणारी, कुंभार, काकणें, लांकडी काम, चांमड्याचें काम, विणण्याचें काम, तेल काढणें, कागद करणें, सुगंधी पदार्थ .... .... .... ३०३-३१८

प्रकरण ७—इतिहास.

प्राचीन इतिहास (इ. स. १००-१३४७) .... .... .... .... ३१९-३२७

मुसलमानी कारकीर्द (इ. स. १३४७-१७००) .... .... .... ३२७-३३१

मराठा कारकीर्द (इ. स. १७००-१८८५) शिवाजी दुसरा (१७००-१७१२), संभाजी दुसरा (१७१२-१७६०), शिवाजी तिसरा (१७६०-१८१२) .... .... .... .... .... .... ३३१-३४७

शंभू (१८१२-१८२१), शहाजी (१८२१-१८३७), शिवाजी चवथा (१८३७-१८६६), राजाराम दुसरा (१८६६-१८७०), शिवाजी पांचवा (१८७०-१८८३), शाहू, वंशवृक्ष .... .... .... ३४७-३६२

प्रकरण ८—जमीन.

कामगार (१८४४-१८८४), खेड्यांतील अधिकारी, जमिनीचा सत्ताप्रकार, पट्ट्या, जमाबंदीचा इतिहास .... .... .... .... ३६३-३७५

तरमजमाबंदी, ऋतुमानाविषयीं माहिती .... .... .... .... ३७६-३९७

प्रकरण ९—न्याय.

दिवाणी व फौजदारी न्याय १८४५ पूर्वी, न्याय खात्यांत फेरफार (१८४८, १८६२, १८६७, १८७३, १८८२), दिवाणी कोर्टें (१८७७-१८८३), दस्तऐवज नोंदणें, माजिस्रेटी काम, फौजदारी कोर्टें (१८७७-१८८३), खेड्यांतील पोलीस, गुन्हे करणाऱ्या जातीचे लोक, गुन्हे, तुरुंग.... .... .... .... .... .... ३९८-४१७

प्रकरण १०—वसूल.

काळीचा वसूल, ताळेबंद, लोकलफंड, म्युनिसिपालिट्या .... .... ४१८-४२१

प्रकरण ११—शिक्षण.

शाळा, पुस्तकालयें, वर्तमानपत्रें .... .... .... .... ४२२-४२७

प्रकरण १२—आरोग्य व रोगराई.

# परिशिष्ट (अ)

## कोल्हापूर शहरांतील उष्णमानें व पर्जन्य वृष्टि सन १८७१-१८८१

| महिने. | १८७१. | | | | | १८७२. | | | | | १८७३. | | | | | १८७४. | | | | | १८७५. | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य |
| | लघुतम,फ़ा. | महत्तम,फ़ा. | मध्यम लघुतम,फ़ा. | मध्यम महत्तम,फ़ा. | इंच. | लघुतम,फ़ा. | महत्तम,फ़ा. | मध्यम लघुतम,फ़ा. | मध्यम महत्तम,फ़ा. | इंच. | लघुतम,फ़ा. | महत्तम,फ़ा. | मध्यम लघुतम,फ़ा. | मध्यम महत्तम,फ़ा. | इंच. | लघुतम,फ़ा. | महत्तम,फ़ा. | मध्यम लघुतम,फ़ा. | मध्यम महत्तम,फ़ा. | इंच. | लघुतम,फ़ा. | महत्तम,फ़ा. | मध्यम लघुतम,फ़ा. | मध्यम महत्तम,फ़ा. | इंच. |
| जानेवारी...... | ५१ | ८८ | ६२ | ७१ | ... | ५५ | ८२ | ६२ | ७७ | ... | ६० | ८१ | ६७ | ७६ | ... | ६४ | ८२ | ६७ | ७७ | ... | ६० | ७६ | ६५ | ७४ | ०·१० |
| फेब्रुवारी...... | ६१ | ९१ | ६८ | ८४ | ... | ६४ | ९५ | ६६ | ७१ | ... | ५५ | ८७ | ७२ | ८२ | १·०० | ६२ | ८७ | ६८ | ७८ | ... | ६३ | ७७ | ६१ | ७६ | ... |
| मार्च...... | ६१ | ९५ | ७५ | ९० | ... | ६७ | ९० | ७० | ८६ | ... | ७२ | ९५ | ७७ | ८८ | ०·०६ | ७२ | ९० | ७४ | ८५ | ०·७८ | ७० | ८८ | ७२ | ७९ | २·६४ |
| एप्रिल...... | ७२ | ९६ | ७६ | ९२ | ०·३० | ६८ | ९२ | ७४ | ८१ | १·०४ | ७३ | ९१ | ७७ | ८१ | २·१० | ७५ | ९४ | ७७ | ८९ | ०·०६ | ७१ | ८७ | ७७ | ८४ | १·१२ |
| मे...... | ७२ | ९६ | ७४ | ८८ | १·११ | ६१ | ९१ | ७५ | ८६ | २·८० | ७६ | ९५ | ७८ | ९० | २·६५ | ७६ | ९४ | ७८ | ८८ | १·५५ | ७६ | ९१ | ७८ | ८१ | ८·८१ |
| जून...... | ७२ | ८१ | ७४ | ७१ | ७·५१ | ७२ | ९० | ७५ | ८१ | ९·५२ | ७२ | ९० | ७५ | ८० | ७·४६ | ७४ | ८६ | ७५ | ८० | ३·३० | ७४ | ८१ | ७० | ८२ | ९·४४ |
| जुलई...... | ७१ | ८१ | ७४ | ७७ | १४·३५ | ७२ | ८२ | ७४ | ७७ | १५·२३ | ७१ | ७६ | ७२ | ७४ | ४१·०१ | ७१ | ७१ | ७२ | ७६ | १५·५८ | ७२ | ७८ | ७४ | ७६ | २·६६ |
| आगस्ट...... | ७२ | ८१ | ७२ | ७६ | ३·१२ | ७१ | ७१ | ७२ | ७५ | १०·८० | ७२ | ८० | ७२ | ७६ | ३·६८ | ७२ | ७८ | ७२ | ७६ | ५·३४ | ७२ | ७१ | ७४ | ७८ | २·८५ |
| सप्टेंबर...... | ७१ | ८० | ७२ | ७१ | ४·८३ | ७१ | ८० | ७२ | ७७ | १२·८५ | ७२ | ९१ | ७३ | ७८ | ४·३० | ७२ | ७१ | ७४ | ७८ | ४·६८ | ७२ | ८१ | ७५ | ७८ | ९·५० |
| आक्टोबर...... | ७० | ८९ | ७३ | ७८ | ४·०० | ७३ | ८३ | ७५ | ८० | २·६३ | ७२ | ८४ | ७४ | ८० | ०·७७ | ७१ | ८१ | ७३ | ७७ | ११·१२ | ७४ | ८१ | ७५ | ८१ | ०·११ |
| नवंबर...... | ६१ | ८२ | ७३ | ८० | ०·४५ | ६८ | ८४ | ७१ | ८१ | ... | ६८ | ८५ | ७१ | ८० | ... | ७१ | ७१ | ७१ | ७७ | ०·१४ | ६७ | ७१ | ७० | ७७ | ... |
| डिसेंबर...... | ५५ | ८१ | ६१ | ७७ | ०·३० | ६१ | ८२ | ६७ | ७४ | ०·६८ | ६० | ७८ | ६५ | ७५ | ... | ६७ | ७८ | ७० | ७६ | ... | ७० | ७१ | ६४ | ७५ | १·०४ |
| सरासरी...... | ७४ | ७१ | ७१ | ८२ | ३६·६१ | ६७ | ८४ | ७१ | ८० | ५५·५५ | ६१ | ८६ | ७२ | ८० | ६३·११ | ७० | ८१ | ७२ | ७१ | ४३·७६ | ७० | ८२ | ७२ | ७१ | ३८·५६ |



परिशिष्ट (अ) उष्णमानें व पर्जन्यवृष्टि १८७१-१८८१

## कोल्हापूर शहरांतील उष्णमानें व पर्जन्यवृष्टि सन १८५१–१८८१ पु. चा.

| महिने | १८५६. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. | १८५७. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. | १८५८. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. | १८५९. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. | १८६०. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जानुआरी ... | ६७ | ८१ | ६१ | ७० | ... | ६५ | ७६ | ६१ | ७४ | ०.४३ | ६२ | ८५ | ६६ | ७५ | ... | ६८ | ७६ | ६८ | ७५ | ... | ६० | ८२ | ६३ | ७६ | ... |
| फेब्रुवारी ... | ६७ | ८५ | ७१ | ८० | ... | ६८ | ८५ | ७२ | ८० | ... | ७० | ८८ | ७२ | ८४ | ... | ७० | ८६ | ७१ | ८१ | ... | ६७ | ८६ | ७७ | ८२ | ... |
| मार्च ... | ७४ | ९१ | ७७ | ८५ | १.३५ | ७२ | ८९ | ७६ | ८५ | ०.५० | ७० | ९२ | ७६ | ८९ | ०.४९ | ६९ | ९३ | ७४ | ८७ | १.३१ | ७० | ९० | ७५ | ८५ | ०.४० |
| एप्रिल ... | ७६ | ९६ | ८० | ८६ | ०.५५ | ७४ | ९० | ७७ | ८६ | १.८० | ८० | ९२ | ८० | ८९ | २.१७ | ७७ | ९५ | ७१ | ८८ | ४.३५ | ७१ | ९३ | ७५ | ८५ | १.२२ |
| मे ... | ७५ | ९१ | ७८ | ८५ | ८.६७ | ७७ | ८८ | ७८ | ८५ | ६.२५ | ७५ | ८९ | ७८ | ८६ | ३.१५ | ७८ | ९४ | ८२ | ८९ | ३.३१ | ७६ | ९४ | ७१ | ९१ | ०.३३ |
| जून ... | ७३ | ८६ | ७५ | ७८ | ११.२१ | ७६ | ८५ | ७६ | ८० | ८.१६ | ७४ | ८९ | ७६ | ८२ | ४.५२ | ७४ | ८९ | ७६ | ८७ | २.३८ | ७४ | ८७ | ७६ | ८६ | ४.६२ |
| जुलई ... | ७४ | ८१ | ७५ | ७६ | १४.३० | ७४ | ७९ | ७५ | ७६ | ५.६३ | ७४ | ८० | ७४ | ७६ | १२.२७ | ७५ | ८६ | ७६ | ८२ | १६.२७ | ७१ | ७४ | ७४ | ८० | ९.६० |
| आगस्ट ... | ७३ | ७८ | ७२ | ७७ | ५.२२ | ७२ | ७६ | ७२ | ७७ | ११.२५ | ७३ | ७८ | ७४ | ७६ | ४.६२ | ७३ | ८२ | ७३ | ७७ | ३.३९ | ७१ | ८१ | ७१ | ७६ | ६.१२ |
| सपटंबर ... | ७३ | ७१ | ७४ | ७१ | ६.४० | ७१ | ७६ | ७३ | ७५ | १.१६ | ७२ | ८१ | ७४ | ७७ | ४.४९ | ७४ | ८८ | ७५ | ८१ | ५.६१ | ७२ | ८१ | ७४ | ७८ | ३.१८ |
| आक्टोबर ... | ७२ | ८० | ७४ | ७६ | ३.२८ | ७० | ८० | ७५ | ७७ | ६.६३ | ७१ | ८१ | ७६ | ८० | ६.६१ | ७१ | ८३ | ७४ | ८० | ०.४० | ७१ | ८३ | ७५ | ८० | १.०१ |
| नोवेंबर ... | ६८ | ८१ | ७२ | ७१ | ०.२७ | ६१ | ८४ | ६८ | ७८ | ४.१२ | ६७ | ७९ | ७० | ७६ | १.१३ | ६१ | ८३ | ६१ | ७१ | ०.६७ | ६० | ८६ | ७१ | ७० | ... |
| दिजंबर ... | ६४ | ७६ | ६७ | ७७ | ०.११ | ६२ | ८४ | ६४ | ७१ | ... | ६२ | ७८ | ६६ | ७४ | ... | ६४ | ७१ | ६६ | ७६ | ... | ६१ | ९१ | ७० | ८५ | ... |
| सरासरि ... | ७१ | ८३ | ७२ | ७९ | ५२.३५ | ७० | ८२ | ७२ | ७६ | ५५.९३ | ७० | ८५ | ७३ | ७९ | ४२.४८ | ७१ | ८६ | ७२ | ८१ | २५.७७ | ६८ | ८६ | ७४ | ८० | ३४.३३ |

# कोल्हापूर शहरांतील उष्णमानें व पर्जन्यवृष्टि सन १८५१ – १८८१ पुढें चालू.

| महिने | १८६१. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. | १८६२. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. | १८६३. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. | १८६४. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. | १८६५. उष्णमान. लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | पर्जन्य इंच. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | ६० | ८९ | ६४ | ८५ | ०.११ | ६१ | ९१ | ६३ | ८० | ... | ६१ | ९० | ६२ | ७४ | ... | ५० | ८८ | ५१ | ८२ | ... | ६२ | ८८ | ६५ | ८६ | ०.११ |
| फेब्रुवारी | ६४ | ९१ | ६६ | ९१ | ... | ६४ | ९५ | ६६ | ९२ | ... | ६० | ९० | ६५ | ८८ | ०.१२ | ६१ | ८९ | ६३ | ८६ | ... | ६२ | ९० | ६८ | ८६ | ०.०२ |
| मार्च | ६५ | ९९ | ७० | ९२ | ... | ६३ | ९६ | ७० | ९६ | ... | ६८ | ९८ | ७१ | ९४ | ०.४३ | ६३ | ९५ | ७० | ९२ | ... | ६९ | ९८ | ७२ | ९३ | ... |
| एप्रिल | ७५ | १०२ | ७१ | ९८ | २.५१ | ७२ | १०० | ७५ | ९१ | १.१४ | ७३ | १०५ | ७५ | ९७ | ०.०४ | ७२ | ९९ | ७५ | ९४ | ०.८५ | ७२ | १०३ | ७६ | ९० | ५.१२ |
| मे | ७३ | १०१ | ७४ | ९६ | १.२५ | ७३ | ९९ | ७४ | ९० | १.६८ | ६९ | १०२ | ७४ | ९६ | ... | ७१ | ९५ | ७४ | ९१ | १.५० | ७५ | ९६ | ७६ | ८९ | ६.७५ |
| जून | ७० | ८६ | ७२ | ८२ | ४.२८ | ७१ | ९५ | ७४ | ८३ | १०.९० | ७२ | ९१ | ७३ | ८१ | ११.८८ | ७२ | ९१ | ७४ | ८० | १२.९६ | ७३ | ८५ | ७५ | ८४ | २.१७ |
| जुलई | ७० | ८० | ७१ | ७५ | १४.९६ | ७३ | ८४ | ७४ | ८० | ७.२७ | ७१ | ७९ | ७२ | ७६ | ८.९० | ७१ | ८२ | ७२ | ७६ | १३.४१ | ७३ | ८२ | ७१ | ७८ | ७.१० |
| आगस्ट | ७० | ८० | ७१ | ७५ | १३.०६ | ७० | ८० | ७३ | ७७ | ८.३६ | ७० | ७८ | ७१ | ७६ | ५.३६ | ७१ | ८२ | ७१ | ७७ | ४.०४ | ७१ | ८१ | ७२ | ७६ | ११.५६ |
| सपटंबर | ६९ | ८८ | ७० | ७१ | २.८६ | ७३ | ८९ | ७५ | ८३ | ७.७३ | ७० | ८५ | ७१ | ७८ | १.७१ | ७० | ८५ | ७१ | ८० | ३.८५ | ६९ | ८६ | ७१ | ७९ | ०.९४ |
| आक्टोबर | ६३ | ९० | ६९ | ८१ | ६.७६ | ६३ | ७० | ७१ | ८० | ०.७२ | ६३ | ९० | ७१ | ८३ | ५.१८ | ६९ | ९० | ७१ | ८७ | ०.१७ | ६९ | ९१ | ७१ | ८४ | ४.३१ |
| नोवेंबर | ५७ | ९२ | ६५ | ८९ | ... | ६२ | ८९ | ६८ | ८१ | ०.३७ | ६३ | ८८ | ६६ | ८६ | ... | ६४ | ८८ | ७० | ८५ | ०.९८ | ६२ | ९१ | ७२ | ८६ | ०.५५ |
| दिजंबर | ५७ | ८७ | ६१ | ८५ | ... | ५७ | ८६ | ६१ | ८३ | ... | ६१ | ८५ | ६४ | ८१ | ०.६५ | ६३ | ८८ | ६६ | ८५ | ... | ६२ | ८६ | ६७ | ८५ | ०.१० |
| सरासरी | ६६ | ९० | ६८ | ८५ | ४४.७१ | ६८ | ९० | ६८ | ८६ | ४५.०७ | ६६ | ९० | ६९ | ८४ | ३४.९१ | ६६ | ८० | ६८ | ८४ | ३७.७६ | ६८ | ८९ | ७१ | ८३ | ३९.६१ |

## कोल्हापूर शहरांतील उष्णमानें व पर्जन्यवृष्टि सन १८५१–१८८१ पु. चा.

| महिने. | १८६६. | | | | | १८६७. | | | | | १८६८. | | | | | १८६९. | | | | | १८७०. | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य |
| | लघुतम फ्रं. | महत्तम फ्रं. | मध्यम लघुतम फ्रं. | मध्यम महत्तम फ्रं. | इंच. | लघुतम फ्रं. | महत्तम फ्रं. | मध्यम लघुतम फ्रं. | मध्यम महत्तम फ्रं. | इंच. | लघुतम फ्रं. | महत्तम फ्रं. | मध्यम लघुतम फ्रं. | मध्यम महत्तम फ्रं. | इंच. | लघुतम फ्रं. | महत्तम फ्रं. | मध्यम लघुतम फ्रं. | मध्यम महत्तम फ्रं. | इंच. | लघुतम फ्रं. | महत्तम फ्रं. | मध्यम लघुतम फ्रं. | मध्यम महत्तम फ्रं. | इंच. |
| जानुआरी.... | ५८ | ८१ | ६४ | ८६ | ... | ६० | ८१ | ६४ | ८९ | ... | ५१ | ८७ | ६३ | ८९ | ... | ६० | ९१ | ६१ | ८८ | ... | ५२ | ८१ | ६४ | ८२ | ... |
| फेब्रुवारी.... | ५१ | ९४ | ६५ | ८६ | ... | ६२ | ९२ | ६८ | ८१ | ... | ५८ | ९४ | ६५ | ९० | ... | ६० | ९५ | ६२ | ८१ | ... | ५८ | ९८ | ६४ | ८८ | ... |
| मार्च.... | ६१ | १०० | ७३ | ९४ | ... | ६७ | ९५ | ७१ | ९० | ... | ५८ | ९८ | ६१ | ९२ | ... | ६५ | ९९ | ७० | ९३ | ... | ६५ | ९४ | ७० | ९२ | ०·१२ |
| एप्रिल.... | ६१ | १०१ | ७० | ९१ | ... | ७० | ९७ | ७४ | ९२ | २·९५ | ७० | १०४ | ७५ | ९६ | ०·७५ | ७१ | १०८ | ७५ | ९८ | ०·८६ | ६८ | ९९ | ७२ | ९६ | १·३५ |
| मे.... | ७१ | ९१ | ७५ | ९५ | ... | ७४ | ९७ | ७६ | ९२ | १·७५ | ७४ | १०० | ७२ | ९४ | ३·७१ | ७४ | १०३ | ७६ | ९४ | २·२४ | ७० | ९९ | ७२ | ९४ | १·२१ |
| जून.... | ७३ | ९१ | ७४ | ८५ | ६·११ | ७२ | ८६ | ७५ | ८० | ९·८१ | ७२ | ९५ | ७२ | ८२ | १०·३१ | ७४ | ९१ | ७५ | ८५ | ३·७७ | ७० | ९५ | ७२ | ८५ | ९·२५ |
| जुलई.... | ७१ | ८३ | ७३ | ७८ | १०·८६ | ७० | ८७ | ७१ | ७१ | ५·४५ | ७० | ८५ | ७१ | ८० | ७·८८ | ७२ | ८९ | ७२ | ७१ | ६·८२ | ७० | ८२ | ७० | ७७ | १२·४० |
| आगस्ट.... | ७० | ८१ | ७१ | ७७ | ५·१५ | ७० | ७९ | ७४ | ७७ | ७·१९ | ७० | ९१ | ७२ | ८२ | ७·६८ | ७२ | ८१ | ७३ | ८० | ५·४० | ७० | ८४ | ७० | ७३ | ५·२३ |
| सप्टेंबर.... | ७० | ८५ | ७१ | ८० | ०·९२ | ६८ | ८२ | ७१ | ७८ | १·९१ | ७८ | ८४ | ७१ | ८० | ३·४६ | ७१ | ८८ | ७२ | ७१ | ५·०३ | ६१ | ८२ | ६८ | ८० | ७·३३ |
| आक्टोबर.... | ६५ | ८१ | ७२ | ८६ | २·११ | ७१ | ८१ | ७२ | ८६ | १०·२५ | ६० | ९२ | ७२ | ८७ | २·५५ | ६१ | ८१ | ७१ | ८२ | ३·२२ | ६५ | ८५ | ७२ | ८२ | ९·६५ |
| नवंबर.... | ५१ | ८१ | ६६ | ८५ | ... | ५८ | ८८ | ६४ | ८४ | ०·७६ | ६१ | ९१ | ६५ | ८८ | ... | ५६ | ८९ | ६७ | ८२ | २·२८ | ६० | ८७ | ६८ | ८८ | ०·५५ |
| डिसेंबर.... | ५८ | ८५ | ६४ | ८२ | ... | ५१ | ८७ | ६३ | ८४ | ... | ६० | ८८ | ६३ | ८५ | ... | ५६ | ८१ | ६५ | ८२ | १·६० | ५६ | ८५ | ५७ | ८२ | ... |
| सरासरी.... | ६४ | ९१ | ६९ | ८५ | २८·५६ | ६६ | ८९ | ७० | ८४ | ३१·१५ | ६५ | ९२ | ६१ | ८६ | ३६·२५ | ६६ | ९२ | ७० | ८६ | ३०·२१ | ६४ | ९० | ६८ | ८५ | ४४·०२ |

# कोल्हापूर शहरांतील उष्णमानें व पर्जन्यवृष्टि सन १८७१–१८८१ पु. चा.

| महिने. | १८७१. | | | | | १८७२. | | | | | १८७३. | | | | | १८७४. | | | | | १८७५. | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य. | उष्णमान. | | | | पर्जन्य. | उष्णमान. | | | | पर्जन्य |
| | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. |
| जानुआरी.... | ५८ | ८७ | ६२ | ८३ | ०·५९ | ५७ | ७७ | ६१ | ७४ | ... | ५१ | ८१ | ५६ | ८५ | ... | ५१ | ८७ | ५८ | ८१ | ... | ५२ | ८५ | ५९ | ८१ | ... |
| फेब्रुवारी.... | ६० | ९५ | ६५ | ८१ | ... | ६० | ९२ | ६५ | ८१ | ... | ६६ | ९९ | ७१ | ८६ | ०·३४ | ५१ | ८६ | ६४ | ८८ | ०·१४ | ५८ | ९४ | ६५ | ८७ | ... |
| मार्च.... .... | ६० | ९९ | ६३ | ९५ | ०·०४ | ६८ | १०० | ५४ | ९४ | ... | ६० | १०१ | ६४ | ९३ | ... | ६४ | ९८ | ७० | ९५ | ... | ६१ | ९८ | ७१ | ९७ | ०·०६ |
| एप्रिल.... .... | ७० | १०२ | ७४ | ९८ | १·१७ | ७२ | १०० | ७५ | ९५ | १·४८ | ७० | ९९ | ७३ | ९८ | २·१७ | ६४ | १०६ | ६९ | १०० | २·७१ | ७० | ९९ | ७४ | ९५ | ०·७२ |
| मे.... .... .... | ७१ | ९६ | ७४ | ८७ | २·३२ | ७२ | ९९ | ७४ | ९६ | २·३५ | ७१ | १०० | ७४ | ९६ | ३·६१ | ७० | १०८ | ७४ | ९६ | २·९३ | ७० | ९५ | ७२ | ८३ | १·४० |
| जून.... .... | ७१ | ८५ | ७२ | ७९ | ८·३४ | ७१ | ९९ | ७४ | ८७ | ८·५२ | ७१ | ८६ | ७३ | ८२ | २·०३ | ७१ | ८४ | ७३ | ८१ | १२·०६ | ७१ | ९९ | ७३ | ८२ | ९·९५ |
| जुलई.... .... | ७० | ७६ | ७१ | ७४ | ११·०१ | ७० | ७८ | ७१ | ७४ | १२·१८ | ७० | ८५ | ७१ | ७५ | १२·०३ | ६१ | ७८ | ७० | ७६ | १६·९९ | ७० | ८० | ७० | ७७ | २६·९७ |
| आगस्ट.... .... | ६१ | ७९ | ७० | ७६ | ६·२२ | ७० | ८० | ७० | ७७ | ३·९४ | ६१ | ८५ | ७० | ७७ | ४·३७ | ६१ | ७७ | ७० | ७५ | ६·४४ | ७० | ७९ | ७० | ७७ | ७·६० |
| सपटंबर.... .... | ६१ | ८१ | ७० | ७८ | २·४५ | ६१ | ८२ | ७१ | ७१ | ४·५१ | ६१ | ८८ | ७० | ७६ | २·१३ | ७१ | ८० | ७२ | ७७ | ६·७२ | ६१ | ८० | ७० | ७७ | ७·३४ |
| आक्टोबर.... | ६७ | ८२ | ७२ | ७८ | ८·४१ | ६२ | ८७ | ६८ | ८३ | ३·६४ | ६४ | ८८ | ७० | ८१ | ३·०२ | ६४ | ८८ | ७१ | ८२ | ८·२० | ६५ | ९१ | ७० | ८४ | ०·८३ |
| नोवेंबर.... .... | ६६ | ८१ | ७२ | ७८ | ०·६५ | ५७ | ८१ | ६३ | ८६ | ०·५६ | ५७ | ९१ | ६३ | ८८ | ०·२६ | ६० | ८५ | ६४ | ८१ | ०·१५ | ६१ | ८८ | ६७ | ८३ | ०·०४ |
| दिजंबर.... .... | ६० | ७१ | ६३ | ७० | ... | ५३ | ८६ | ६१ | ८१ | १·५६ | ५७ | ८८ | ६२ | ८५ | ... | ५४ | ८७ | ६१ | ८२ | ०·१८ | ५२ | ८६ | ६० | ८५ | ०·४२ |
| सरासरी.... .... | ६६ | ८६ | ६९ | ८२ | ३८·५० | ६२ | ९७ | ६७ | ८४ | ३९·५४ | ६४ | ९० | ६८ | ८५ | ३१·५५ | ६३ | ८० | ६८ | ८४ | ५६·४२ | ६४ | ८८ | ६८ | ८३ | ५५·३४ |

# कोल्हापूर शहरांतील उष्णमानें व पर्जन्यवृष्टि सन १८५१–१८८१ पुढें चालू.

| महिने. | १८७६. | | | | | १८७७. | | | | | १८७८. | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य |
| | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. |
| जानेवारी... | ५० | ८९ | ६२ | ८६ | ... | ५८ | ८८ | ६४ | ८७ | ... | ५६ | ८९ | ६० | ८६ | ... |
| फेब्रुवारी... | ६० | ८८ | ६४ | ७० | .... | ५४ | ९० | ६७ | ८० | ०.०७ | ६३ | ८५ | ६३ | ८२ | ... |
| मार्च... | ६५ | ९६ | ७१ | ९२ | ... | ७० | ९६ | ७३ | ९१ | ... | ६४ | ९९ | ७२ | ८७ | ... |
| एप्रिल... | ७० | ९९ | ७५ | ९६ | ०.२६ | ७० | ९९ | ७१ | ७२ | ०.७८ | ७४ | ९९ | ७४ | ९५ | ३.३० |
| मे... | ७० | ९७ | ७७ | ९५ | ... | ६९ | १०२ | ७४ | ९६ | ०.९७ | ७२ | ९७ | ७५ | ९५ | ०.७४ |
| जून... | ७१ | ९४ | ७३ | ८१ | ३.१७ | ७० | ९९ | ७३ | ८४ | १३.१६ | ७२ | ९७ | ७४ | ८८ | ५.५३ |
| जुलई... | ७१ | ८६ | ७२ | ८४ | १६.४२ | ७१ | ८५ | ७३ | ८२ | २.३० | ७१ | ८७ | ७३ | ८१ | १२.३५ |
| आगस्ट... | ७१ | ८० | ७२ | ७८ | ४.५४ | ७१ | ८५ | ७२ | ८० | ८.२० | ७१ | ८५ | ७० | ८० | १२.६८ |
| सपटेंबर... | ७१ | ८५ | ७२ | ७८ | १.४५ | ७१ | ८२ | ७२ | ७६ | ११.०५ | ७१ | ८५ | ७२ | ८१ | ७.६५ |
| आक्टोबर... | ६५ | ९० | ७१ | ८० | ०.७५ | ७२ | ८० | ७२ | ७३ | ८.०१ | ७२ | ८४ | ७३ | ७८ | ६.६० |
| नोवेंबर... | ६० | ८९ | ६५ | ७८ | ... | ६० | ८१ | ६५ | ८४ | ... | ६४ | ८९ | ६८ | ८२ | ०.६० |
| दिजंबर... | ६० | ८९ | ६२ | ८७ | ... | ६४ | ८९ | ६५ | ८९ | ... | ५५ | ८९ | ५७ | ८८ | ... |
| सरासरि... | ६५ | ९० | ६९ | ८७ | २६.५१ | ६७ | ९० | ७० | ८५ | ४५.४२ | ६७ | ९० | ६९ | ८५ | ५०.६५ |

| महिने. | १८७९. | | | | | १८८०. | | | | | १८८१. | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य | उष्णमान. | | | | पर्जन्य |
| | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. | लघुतम, फा. | महत्तम, फा. | मध्यम लघुतम, फा. | मध्यम महत्तम, फा. | इंच. |
| जानेवारी... | ५४ | ८६ | ६० | ८१ | ... | ५२ | ८५ | ५५ | ८४ | ... | ५३ | ८० | ५८ | ८२ | ... |
| फेब्रुवारी... | ५६ | ८६ | ५९ | ८५ | ०.०६ | ५३ | ९४ | ५१ | ८० | ... | ५९ | ८१ | ६१ | ८५ | ... |
| मार्च... | ६६ | ९७ | ८३ | ९५ | ०.०२ | ६८ | ९७ | ७१ | ९३ | १.१५ | ६५ | ९६ | ६८ | ८८ | ... |
| एप्रिल... | ७१ | १०१ | ७४ | ९० | ०.६१ | ७३ | ९९ | ७६ | ८१ | ०.९६ | ७२ | ९९ | ७६ | ९१ | १.६५ |
| मे... | ६१ | ९९ | ७७ | ८६ | ३.०४ | ७५ | ९९ | ७१ | ८१ | १.७७ | ७८ | १०१ | ७९ | ९२ | ०.८५ |
| जून... | ७२ | ८५ | ७३ | ८२ | ८.५३ | ६९ | ८० | ७४ | ८२ | ८.४४ | ७३ | ९० | ७५ | ८० | ९.१० |
| जुलई... | ७० | ८४ | ७३ | ८१ | ६.३३ | ७१ | ८१ | ७२ | ८५ | ९.३५ | ७० | ८३ | ७२ | ८० | १०.०८ |
| आगस्ट... | ७१ | ७७ | ७२ | ७५ | १९.७७ | ७२ | ८६ | ७३ | ८२ | १.४८ | ७२ | ८२ | ७२ | ७७ | ८.५६ |
| सपटेंबर... | ७२ | ७९ | ७३ | ७८ | १.५८ | ७१ | ८६ | ७२ | ८४ | ४.१५ | ७० | ८१ | ७३ | ८० | ३.२४ |
| आक्टोबर... | ६५ | ८६ | ७० | ८२ | ५.९७ | ७२ | ८६ | ७४ | ८४ | ७.८५ | ६५ | ८७ | ७२ | ८४ | ४.४६ |
| नोवेंबर... | ५७ | ८६ | ६२ | ८३ | १.२४ | ६८ | ८१ | ७० | ८२ | १.८७ | ५४ | ८२ | ६४ | ८१ | १.६० |
| दिजंबर... | ५१ | ८५ | ५१ | ८१ | ०.२० | ५६ | ८७ | ६० | ८१ | ... | ५२ | ८६ | ५८ | ८२ | ... |
| सरासरि... | ६४ | ८७ | ६९ | ८३ | ४८.४५ | ६६ | ८८ | ६० | ८४ | ३७.०२ | ६४ | ८९ | ६९ | ८३ | ३३.९६ |

# परिशिष्ट (ब)

## झाडें.

कोल्हापूर प्रांतांतील मुख्य झाडांची वर्णानुक्रमानें यादी दिली आहे.

परिशिष्ट (ब)
झाडें.

असनः- असनाचीं झाडें सह्याद्रीवर आणि पश्चिम भागीं दुसऱ्या सरपळलेल्या जंगलांत वाढतात. हें झाड बरेंच मोठें होऊन त्याचा विस्तार बराच असतो, आणि इमारतीच्या उपयोगीं असें मजबूद लाकूड या पासून मिळतें. हें लाकूड पाण्यांत फार टिकाऊ असतें, म्हणून विहिरीचे रहाट व घडघडे व त्याच्या चौकटी करण्यास या लाकडाचा फार उपयोग करितात. याची साल फार तुरट असते, आणि याचीं पानें गुरें खातात. व त्यां पासून त्यांस कृमि झाले असल्यास गूण येतो.

अर्जूनः- अर्जून हें झाड पश्चिमेकडे नदीओढ्यांच्या किनारीं फार दृष्टीस पडतें. हें बऱ्याच आकाराचें मोठें वाढतें, आणि पुष्कळ अंशीं काळ्या ऐना प्रमाणें चांगलें व उपयोगीं समजतात. याचें लाकूड इमारतीस व शेतकीच्या आउतांस घेतात.

आंबाः- आंब्याचीं झाडें पश्चिमेकडील बहुतेक डोंगरांत जरी आढळतात, तथापि हें नेहमी जंगलांत आढळणारें झाड नाहीं. परंतु पश्चिमेकडे प्रत्येक खेड्यानजीक हीं झाडें असतात. आंब्याच्या लाकडाचा क्वचित उपयोग करितात. रत्नागिरीकडील कलमी आंबे आलीकडे इकडे लावण्यांत आले आहेत. परंतु ते इकडे कसे निपजतील हें अद्याप सांगतां येत नाहीं.

आंवळीः- ज्या मैदानांत जंगल वाढलें असेल त्यांत व पश्चिमेकडील कित्येक ओंढ्या टेकड्यांवर आंवळीचीं झाडें वाढतात. आंवळीचें लाकूड कठीण व टिकाऊ असतें, म्हणून त्याच्या पेट्या करितात. तें फरद जोडणीस घेतात, व तें पाण्यांत कुजत नसल्यामुळें या लाकडाचीं चाकें व रहाट करितात. आंवळीची तुरट साल हगवणीवर घेतात. याचीं फळें लोणच्यास व मुरंबऱ्यास उपयोगीं पडतात.

उंबरः- उंबराचीं झाडें जंगलांत व बागांत अशीं दो-

परिशिष्ट (ब)

झाडें.

न्हीं ठिपणी आढळतात. याचें लाकूड सरळ हिरवें असतें, आणि उघड्या हवेंत दिवसें दिवस घट्ट होत जातें. म्हणून इकडील लोक घराच्या दरवाजांस त्याच्या शडपा करितात. याची फळें गरीब लोक खातात. आणि मुळांचा ओषधाकरितां अर्क काढितात.

ऐनः– पश्चिमेकडील जंगलांतील ऐनाचें झाड अत्यंत साधारण सहज वाढणारें आणि फार घट्ट असें आहे. हें बरेंच मोठें व उंच वाढतें. याच्या लाकडाचा इमारतीस व शेतीच्या आरतांस फार उपयोग करितात. याची साल फार तुरट असते. व तिजपासून एक प्रकारचा काळा रंग करितात.

फळवीणः– फळविणीचें झाड राखलेल्या सर्व जंगलांत आढळतें. व बरेंच मोठें वाढतें. याचा हीर सरळ असतो. परंतु फार जवळजवळ असल्यामुळें यास कीड लागत नाहीं. म्हणून याचा इमारतीकरितां व दुसऱ्याकामाकरितां उपयोग करितात.

कवठः– कवठीचीं झाडें साधारणतः बागांत असतात. याचें लाकूड पांढरें घट्ट व बारीक कणदार असतें. याचा उपयोग इमारतीकरितां व नक्षीदार खोदीव कामाकरितां करितात. फळांतील मगज साखरेबरोबर खातात. आणि साखर व पाणि घालून त्याचें सरबतही करितात. व तें प्यालें म्हणजे फार गार वाटतें.

कळंबः– कळंबाचीं झाडें पश्चिमेकडे फार साधारण आहेत. हीं बऱ्याच मोठ्या आकाराचीं होईपर्यंत वाढतात. याचें लाकूड घट्ट व कणदार असतें. व त्याचा उपयोग तक्तपोशीकरितां व चौकटीकरितां फळ्या आणि तुळ्या पाडण्याकरितां करितात. कृष्णाचें प्रियकर झाड असें समजून हिंदु लोक त्यास पूज्य मानितात.

काजूः– आजऱ्याच्या दक्षिणेकडील जंगलांत आणि पश्चिमेस बांड्यो डोंगरावर हीं झाडें आहेत. हें झाड लहान असतें, व याचीं पानें सुरेख असतात. याचें लाकूड भिकार मानतात. परंतु काजू-बिया फार आवडीनें खातात.

किंजळः– किंजळीचीं झाडें पश्चिमेकडील सर्व जंगलांत आढळतात. तीं पुष्कळ मोठीं होऊन त्यांपासून इमारतीच्या उपयोगीं असें चांगलें लाकूड मिळतें.

कुचलाः– कुचल्याचें झाड मध्यम आकाराचें असतें. व त्याचें लाकूड घट्ट व टिकाऊ असतें. या लाकडाचा अनेक कारणाकरितां उपयोग करितात. याचीं मुळें फार कडू असतात. आ-

गि त्याचा उपयोग तापावर आणि विषारी प्राणी चावला असतांत्या-पर करितात. कुचल्याच्या बियांच्या अंगीं मादक गुण आहे.

कुंभाः— सह्याद्रीच्या बहुतेक जंगलांत कुंभ्याचीं झाडें वाढतात. त्याचें लांकूड हलकें असतें परंतु त्यावर सफाई काम चांगलें होतें. त्याचा हीर सरळ असतो. इमारतीकरितां व दुसऱ्या साधारण कामाकरितां याचा उपयोग करितात. त्याच्या सालीचे साथे पण फार उपयोगी दोर निघतात.

कोशिंबः— पश्चिमेकडील कित्येक राखलेल्या जंगलांत कोशिंबीचें झाड आढळतें. याचें लांकूड जड व घट्ट असतें. याचा उपयोग इमारतींकरितां व शेतीच्या आउतांकरितां करितात. तसेंच उंसाच्या घाण्याच्या लाटी आणि उखळें आणि छकड्याच्या चाकांचे आरे याचे करितात.

खैरः— कांहीं थोड्या ठिकाणीं खैराचीं झाडें आढळतात. परंतु हें झाड निःशक्त राहून मोठें वाढत नाहीं. याचें लाकूड फार बळकट व घट्ट असतें, आणि हें सागापेक्षांही अधिक टिकाऊ असेंही समजतात.

चंदनः— करवीर व भुदरगड पेट्यांतील आणि इचलकरंजी संस्थानपैकीं आजरें तालुक्यांतील आणि बावडें संस्थानपैकीं राखलेल्या जंगलांतील थोड्या जंगलांत चंदनाचीं झाडें आढळतात.

चिंचः— बागांत व कुरणांत चिंचेचीं झाडें फार मोठीं वाढतात. चिंचेचें लांकूड जड घट्ट व चिवट असतें. इमारती आणि उंसाचे व तेलाचे घाणे यांकरितां याचा उपयोग करितात. चिंच खातात व औषधाकरितांही तिचा उपयोग करितात; आणि तिचे चिंचुके अर्धवट भाजून हगवणीवर देतात. व त्यांची खळही करितात.

चिवाः— चिवे बहुतेक सर्व ठिकाणी सुरव्यतें नदी, ओढ्याच्या किनारीं आणि दुसऱ्या थंड व ओलसर जाग्यांत वाढतात. चिव्याच्या काठ्या छपरास घालतात, व दुसऱ्याही कामास लावितात. चिवे फोडून त्याच्या बेळांचे तट्टे व बुट्ट्या करितात. घोड्यांस थंडी झाली म्हणजे चिव्याचा पाला देतात.

जांभळः— जेथें पाण्याचा पुरवठा पुष्कळ आहे, अशा जमिनींत जांभळीचीं झाडें पुष्कळ वाढतात. जांभळीचें लांकूड सफाईदार कठीण व घट्ट असतें हें लांकूड पाण्यांत कुजत नाहीं. म्हणून विहिरीच्या तोंडावर घालण्यास व पाण्याचे पन्हळ फ-

परिशिष्ट (ब.)
झाडें.

रण्यास याचा उपयोग करितात. मलकापूर संस्थानांत माण खेड्याच्या नजीक अंबरडी नदीच्या कांठीं आणि पन्हाळगडच्या पश्चिमेकडील खरणीच्या पायथ्यानजीक सपाट जमिनीवर जांभळीचीं मोठीं बनें आहेत. जांभळीचीं पानें व साल तुरट व रांपट असतात, आणि जांभळें लोक मोठ्या आवडीनें खातात.

**धामणः**— धामणीचीं झाडें पश्चिमेकडील डोंगरांत पुष्कळ आढळतात. परंतु पूर्वेकडे फारशीं होत नाहींत. या झाडास योग्य अशी जमीन मिळाल्यास हें झाड बरेंच वाढतें. पलंगाच्या चौकटी, चाकें, कुऱ्हाडी व कुदळीचे दांडे, चाकूच्या मुठी, भात भरडण्याच्या घिरटी आणि सुताराच्या हत्यारांच्या मुठी या लांकडाच्या करितात. याचीं पानें गुरें खातात व फळें मनुष्यें खातात.

**नादरूख**— पश्चिमेकडील जंगलांत नादरुखीचीं झाडें फार आढळत नाहींत. त्याच्या खांद्या जगून सहज मोठीं झाडें होतात. म्हणून रस्त्याच्या बाजूस हीं झाडें फार लावतात. हें झाड दिसण्यांत मोठें शोभिवंत दिसतें, व याची छायाही गडद पडते. याच्या लांकडाचा कित्येक किरकोळ कामाकरितां उपयोग होतो.

**नाना बोंदारः**— पश्चिमेकडील जंगलांत नानाबोंदाराचीं झाडें विपुल आहेत. हें झाड बऱ्याच मोठ्या आकारानें वाढतें. आणि याचें लाकूड घट्ट सरळ आणि चिवट असतें. याचा उपयोग इमारतीस व दुसऱ्या अनेक साधारण कामास करितात.

**निंबः**— पश्चिमेकडच्या जंगलांत निंबाचीं झाडें क्वचित् आढळतात, परंतु हीं झाडें काळ्या जमिनींत, बागांत, परड्यांत आणि शेतांच्या बाजूस सहज वाढतात. याचें लांकूड सफाईदार असतें, व त्याची मानबरी लोक फार मानतात. याची कडू साल पानें व मुळ्या यांचा उपयोग औषधाकरितां फार होतो.

**पळसः**— पळसाचीं झाडें जंगलांत व खेड्याच्या नजीक चांगलीं वाढतात. याचें लांकूड चांगलें नसतें, परंतु त्याच्या पानाच्या पत्रावळीवर हिंदु लोक जेवतात. त्याचीं फुलें शेंदरी रंगाचीं असतात, व उष्णकाळाच्या आरंभीं जंगल या फुलांनीं मोठें शोभायमान दिसतें. पळसाच्या बिया जंतांवर देतात.

**पिंपळः**— कोल्हापूरच्या सर्व भागीं पिंपळाचीं झाडें आढळतात. हिंदु लोक या झाडास पूज्य मानतात, आणि देवळें घरें व

दुसऱ्या इमारती या नजीक हीं झाडें कधीं कधीं मुद्दाम लावतात. याचें लांकूड हलकें असून सरपणाशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपयोगाचें नसतें.

**फणसः**- फणसाची झाडें आपोआप जंगलांत जरी वाढत नाहींत, तरी पश्चिमेकडच्या सर्व टेकड्यांवर हीं झाडें पुष्कळ वाढतात. आणि पश्चिमेकडील खेड्याजवळच्या वनांत फणसाचीं झाडें नेहमी असतात. फणसाचीं फळें लोक फार आवडीनें खातात, व त्याचें लांकूडही इमारतीच्या फार उपयोगीं असतें.

**बकुळः**- बकुळीचीं झाडें जंगलांत क्वचित आढळतात. हें सुवासिक व सुशोभित झाड बागांत असतें, व याच्या फुलास फार गोड वास येतो. याचें लांकूड इमारतीस लावितात, फळें खातात आणि फुलांचें अत्तर काढितात.

**बंदारः**- बंदाराचें झाड चांगलें मोठें झालें म्हणजे फार सुशोभित दिसतें. यास उन्हाळ्यांत फुलें येतात. याचें लांकूड फिकट रंगाचें सरळ आणि चिवट असतें, व त्याचा उपयोग इमारतीस फार करितात.

**बाभळः**- बाभळीचीं झाडें फार उपयोगीं असून कोल्हापूरच्या पूर्वभागीं फार आढळतात. काळ्या जमिनींत मुख्यत्वें नदी किनारीं गाळ पडतो त्याजमिनींत बाभळीचीं झाडें फार लवकर व जोरानें वाढतात. बाभळीचें लांकूड जरी क्वचित सरळ असतें, तरी फार घट्ट असतें. त्याचा उपयोग शेतीच्या आउतांस आणि सरपणाकरितां फार करितात. त्याच्या सालीचा कातडीं रंगविण्यास उपयोग करितात. बाभळीचा चीक हा उपयुक्त डिंक असतो. हिच्या शेंगा उन्हाळ्यांत बकरीं व मेंढरें खातात.

**बाहवाः**- पश्चिमेकडील बहुतेक राखलेल्या जंगलांत बाहव्याचीं झाडें आढळतात. परंतु हीं क्वचित मोठीं होतात. उष्णकाळच्या अखेरीस बाहव्याचीं झाडें लांब फिकट पिंवळ्या रंगाच्या फुलांच्या तुऱ्यांनीं आच्छादलेलीं असतात. याच्या लांकडाचा उपयोग इमारतीस व शेतीच्या आऊतांस करितात. याची साल व मुळें बळकट सारक आहेत.

**बिब्बाः**- पश्चिमेकडील व पूर्वेकडील राखलेल्या जंगलांत बिब्याचीं झाडें आढळतात. हें झाड मध्यम आकाराचें वाढतें, आणि याचा चीक इतका भयंकर कडू आहे कीं, हें झाड अगदीं वाळेपर्यंत क्वचितच तोडतात. याचें लांकूड चिल्लरकामाकरितां घेतात,

परिशिष्ट (ब.)

झाडें.

आणि अनेक दुखापती व रोग यांवर इकडील लोक बिब्याचा उपयोग करितात. याचीं फळें इकडील लोक फार आवडीनें खातात. आणि त्याच्या बिया म्हणजे बिब्बे यांचा उपयोग जखांवर, दुखापतींवर आणि फोड आणण्यास करितात.

बेहडा:– बेहड्याचीं झाडें क्वचित आढळतात. परंतु जेथें हीं झाडें आहेत तेथें त्यांच्या लांकडाचा सर्व कामाकरितां उपयोग होतो. कारण या झाडाच्या आंगीं काळ्या ऐनाच्या झाडाचे सर्व गुण असतात. बेहड्याचीं फळें खोकल्यावर घेतात.

बोर:– बोरीचीं झाडें बागांत व मळ्यांत असतात. हें झाड चांगलें जून झालें म्हणजे त्याचें लांकूड घट्ट व कणदार असतें. याचीं फळें खातात व साळीचाही उपयोग करितात.

भेंडी:– भेंडीचीं झाडें जंगलांत क्वचित असतात. परंतु बागांत आणि रस्त्याच्या बाजूनें फार आढळतात. याच्या खांद्या लौकर जगत असल्यामुळें रस्त्याच्या बाजूस लावण्यास हें सोईचें झाड आहे. याचा बुंधा किंवा खोड पोकळ असल्यामुळें कांहीं उपयोगीं पडत नाहीं. परंतु यांच्या सरळ फांद्यांचे वांसे होतात व घरास घालण्याकरितां त्या वांशांची फार मातबरी समजतात.

रानफणस:– कोल्हापूरच्या नैर्ऋत्येस आणि विशाळगड संस्थानांतील चांदेलच्या जंगलांत रानफणसाचीं झाडें आहेत. हीं मोठ्या आकाराचीं वाढतात. आणि त्याचें लांकूड चांगलें असून घराच्या इमारतीस त्याचा फार उपयोग होतो.

वड:– रस्त्याच्या बाजूस लावण्यास हें एक उत्तम झाड आहे. याच्या खांद्या लावून पाणी घातलें म्हणजे जगतात, आणि चांगल्या जमिनींत त्याचीं प्रचंड झाडें होतात. याचें लांकूड जाळण्याच्या मात्र उपयोगीं पडतें.

वेहेळ:– वेहेळाचीं झाडें कित्येक राखलेल्या जंगलांत आढळतात. हीं झाडें बऱ्याच मोठ्या आकाराचीं वाढतात. व याचें लांकूड हलक्या प्रतीचें असतें.

शिंदी:– ओढे, नद्या, आणि पाण्याचे पाट यांच्या बाजूनें शिंदीचीं झाडें वाढतात. हलक्या जातीचे लोक शिंदीची दारू पितात. शिंदीच्या पात्यांच्या डाल्या व बुट्ट्या विणतात.

शिवण:– भुदरगड पेट्यांतील आणि दुसऱ्या कांहीं जंगलांत शिवणीचीं झाडें कोठें कोठें आढळतात. हीं झाडें जून व मोठीं झालीं म्हणजे याचें लांकूड उत्तम असतें.

परिशिष्ट (ब.)

झाडें.

शिसवा:- सह्याद्रीच्या उंच उतरणीवर क्वचित कोठें शिसव्याचीं झाडें आढळतात.

सागवान:- सह्याद्रीच्या उतरणीवर सागाचीं झाडें आढळतात. परंतु पन्हाळा भुदरगड आणि बावडा या भागांतील कांहीं ठिकाणेंशिवाय करून इतर ठिकाणीं हीं झाडें फारशीं मोठीं वाढत नाहींत. यामुळें या प्रांतीं सागाचे चांगले वांसे मात्र निपजतात.

सोनचांफा:- सोनचांफ्याचीं झाडें बागांत व परड्यांत होतात. याचें सफाईदार व सुरेख लांकूड इमारतीस घेतात, परंतु या झाडाची मातबरी मुख्यत्वें त्याच्या सुवासिक फुलांवर आहे.

सदर शिवाय मळे जमिनींत खालीं लिहिलेलीं झाडें वाढवितात. अननस, केळ, डाळिंब, नारळी, फणस, पेरू, महाळुंग, रामफळ आणि सिताफळ.

कोल्हापूर प्रांतातील मुख्य औषधोपयोगी वनस्पतींची यादी खालीं दिली आहे.

अक्कलकाढा:- हें झाड बागांत आढळतें. ही वनस्पति मोठी उत्तेजक आहे. अगस्त्या सर्वत्र आढळतो. याची साल कडू व शक्तिवर्धक आहे. अडुळसा सर्वत्र सांपडतो. याचीं पानें वमनाकरितां देण्यास उपयोगीं पडतात. अर्जुन सह्याद्रि पर्वतावर आढळतो. याची साल शक्तिवर्धक आहे. आणि जखमेवर बाहेरून उगाळून लावितात. अशोक पूर्वेकडे सपाट प्रदेशांत आढळतो. गर्भाशयाच्या रोगावर याच्या सालीचा उपयोग करितात. असन वनस्पति सह्याद्रीवर सर्वत्र आढळते. हिच्या सालीच्या अंगीं बळकट अवरोधक गुण आहेत. आकाशवेल जंगलांत आढळते. क्षतांवर व डोळे आले म्हणजे त्या विकारावर हिचा उपयोग होतो. आघाडा सर्वत्र आढळतो. याच्या मुळांचा काढा हगवण व आमांश यांवर देतात. आजवल झाड सर्व जंगलांत आढळतें. याची साल जखमांस लावण्यास उपयोगीं पडते. आंबा सर्वत्र आढळतो. त्याची साल मूळव्याधीवर उपयोगी पडते. आलें बागांत होतें. जलोदरावर याचा उपयोग होतो. आंवळे प्रांतांत सर्वत्र आढळतात. ताप, हगवण आणि पित्तविकार यांवर आंवळ्यांचा उपयोग होतो. इसबंद याचा चेटकावर मंत्र घालण्यास उपयोग करितात. उंढणीचीं झाडें सह्याद्रीच्या पश्चिमेकडील नऊ गंड्यांत आढळतात. हिच्या सालीचा उपयोग थंडीवर आणि महारोगावर होतो. उन्हाळी पूर्वेकडील सपाट प्रदेशांत आढळते. ही वनस्पति रक्तशुद्धीकरितां पोटांत घेतात. उपरसाळ. जंगलांत अ-

परिशिष्ट (ब).

औषधिवनस्पति.

सते. हिचीं मुळें खरूज खवडे, नायटे यांवर उपयोगी पडतात. उंबराचीं झाडें या प्रांतीं सर्वत्र आढळतात. याच्या साळीचें पाणी गुळण्या करण्यास देतात, आणि तिच्या आंगीं अवरोधक गुण आहेत. ऊंस मळे जमिनींत होतो. याचीं मुळें मृदुकारी आहेत. एरंड प्रांतांत सर्वत्र ठिकाणीं सांपडतो. या झाडाचे सर्व भाग रेचकाकरितां उपयोगीं पडतात. ओंवा बागांत पेरतात. ओंव्याचें बीं उत्तेजक आहे.

कडूपडवळें जंगलांत आढळतें. हें झाड व याचें फळ या दोहोंचा रेचकाप्रमाणें उपयोग करितात. कण्हेरीचीं झाडें बागांत लावतात. पोटशूळावर हिच्या मुळांचा उपयोग करितात. करंज याच्या पानांचा काढा वायुविकारावर घेतात. करडे शेतांत पिकवितात. हे सारक आहेत. कर्मरंग ही वनस्पति पुष्कळ जंगलांत आढळते. तापांत याच्या फळानें शीतळाई येते. करवंद जंगलांत जिकडे तिकडे असते. सूक्ष्म पित्तविकारावर करवंदीचा उपयोग होतो. कलिंगड मळ्यांत होतें. याच्या बिया शीतळाई आणणाऱ्या व मूत्रोत्पादक आहेत. कवठीचीं झाडें सपाट प्रदेशांत असतात. हिरवें कवठ तुरट असतें, आणि दुसऱ्या औषधीं बरोबर आमांशावर याचा उपयोग करितात. कवडळीचीं झाडें पूर्वेकडे उघड्या प्रदेशांत आढळतात. नाकांतून पू वहात असला तर त्यावर वाफारा देण्यास कवडळांचा उपयोग करितात. कवळी प्रांताच्या डोंगराळ प्रदेशांत आढळते. कवस कुइली जंगलांत आढळते. हिचीं फळें पौष्टिक आहेत. कळंबाचीं झाडें सह्याद्रीच्या खालीं आढळतात. याच्या साळीचा पित्तविकारावर उपयोग होतो. काकजंघ हें झाड कोंकणांत आढळतें. खोकला व ताप यांवर याचा उपयोग होतो. काकडशिंगीच्या पानावरील फोड तुरट व पौष्टिक आहेत. कांगोणीचीं झाडें शेतांत आपोआप वाढतात. कांगोणीचीं फळें पौष्टिक आहेत असें समजतात, आणि काळजाच्या रोगावर त्याचा उपयोग होतो. कांचनाचीं झाडें सर्वत्र आढळतात. याची साल खरूज नायटे वगैरे त्वचेच्या रोगांवर उपयोगी पडते. कांदे मळ्यांत पाणी लावून पिकवितात. कान दुखत असला तर कानांत कांद्याचा रस घालितात, आणि याचें बीं मार्दव आणणारें आहे. कारली शेतांत होते. हिचें बीं जंतांवर उपयोगीं पडतें. काश ही वनस्पति नदीच्या किनाऱ्यावर आढळते. हिचीं मुळें पित्तविकारावर उपयोगीं पडतात. किराईत पश्चिमेकडे डोंगराळ

प्रदेशांत आढळतें. हें कडू असून पौष्टिक आहे. कुचला हें झाड कोंकणांत आढळतें. याचा स्ट्रिकनियासारखा उपयोग करितात. कुटकीचें झाड सह्याद्रीच्या माथ्यावर आढळतें. आमांशावर याचा रस देतात. कुडा हें झाड कोंकणांत आणि कोल्हापूरच्या डोंगराळ प्रदेशांत आढळतें. याची साल व बिया पौष्टिक व ज्वरनाशक आहेत. कुवारकोंड सर्वत्र आढळते. याच्या पाल्याचा रसाळ मगज करटावर पोटिसाप्रमाणें लावतात. केतकीचीं झाडें ओढ्याच्या कांठीं व पाणथळ जमिनींत होतात. केतकीचें पीठ खोकल्यावर देतात. केळीचीं झाडें सर्वत्र असतात. केळीचा रस अत्यंत अवरोधक आहे. आणि रक्त वहात असल्यास तें बंद करण्यासही याचा उपयोग होतो. कोरटे शेतांत पिकतात. त्यांचा खरजेवर उपयोग होतो. कोरांटीचीं चार प्रकारचीं झाडें बागांत आढळतात. हिच्या पाल्याचा खरजेवर, विषारावर आणि खोकल्यावर उपयोग करितात. कोहळ्याचे वेल सकसजमिनींत होतात. कोहाळा पौष्टिक आहे असें समजतात. कोळशिंद्याचीं झाडें पाण्याच्या पाटांत आढळतात. याच्या बियांस तालिमखाना म्हणतात, व तो पौष्टिक आहे असें समजतात. खड्यानाग कोंकणांत आढळतो. याचें मूळ पौष्टिक असून प्रकृतींत फेरबदल करणारें आहे. खैर सह्याद्रीवर आहे. याच्या दोन जाती आहेत. याच्या सालीच्या आंगीं अवरोधक गुण आहेत. गुंजेचे वेल सर्वत्र आढळतात. याचा उपयोग परम्यावर होतो. गुळवेल जंगलांत आढळते. तिचें सत्व मोठें रुचिवर्धक आहे. गेळीचीं झाडें कोंकणांत आढळतात. याचें फळ वमनकारक आहे. गोकर्णीचे वेल बागांत असतात. हिचीं मुळें मुलांस पोट साफ करण्यास देतात. आणि बिया रेच होण्यास देतात. घोळ रानांत वाढते. हिचा रस परम्यावर देतात. घोसाळ्याचे वेल घराच्या परड्यांत असतात. याचीं पानें व फळें तापावर उपयोगीं पडतात.

चंदनाचें झाड बागांत क्वचित आढळतें. पित्ताच्या ओकारीवर आणि ज्वरावर चंदनाच्या लांकडाचा उपयोग होतो. चाकवताचें झाड आपोआप वाढतें. याच्या पाल्याचा जंतांवर व पित्तावर उपयोग करितात. चांफा सर्वत्र आढळतो. याच्या सालीचा सुवासिक औषधी करण्याकरितां उपयोग होतो. चाराचीं झाडें कोंकणांत आढळतात. याच्या सालीचा पित्तविकारावर उपयोग होतो. चिकणमूळ सर्वत्र आढळतें. याच्या मुळाच्या आंगीं चिकचिकीत पदार्थाचे घ-

परिशिष्ट (ब)

औषधिवनस्पति.

मे असतात. चिंचेचीं झाडें शेतांत असतात. चिंचेचे आंगीं पित्तहारक गुण असतात. चित्रकाचीं झाडें कोंकणांत आढळतात. याचीं मुळें अग्निमांद्यावर देतात. चिबडाचे वेल मळेजमिनींत वाढतात. याच्या बियांनीं खोकला व थंडी होते. चुका मळे जमिनींत होतो. तो थंड व अवरोधक असतो. जटामावशीचीं झाडें ओढ्याजवळ असतात. याचीं मुळें उद्दीपक आहेत. जाई, मालती आणि कुंद यांचे वेल बागांत लावतात. जांभळीचीं झाडें सर्वत्र आढळतात. दीर्घकालिक आमांशावर हिच्या सालीचा काढा देतात. जास्वंदीचीं झाडें बागांत लावतात. परम्याच्या सूक्ष्म विकारावर याच्या पाल्याचा उपयोग करितात. ज्येष्ठमध हें मृदुत्व आणणारें मोठें उपयोगी मूळ आहे. झांबरीचीं झाडें बागांत होतात. याचा रस शीतलता आणणारा पेयपदार्थ आहे, आणि हा अग्निमांद्यावर उपयोगी पडतो.

टाकळा पूर्वेकडील सपाट प्रदेशांत आढळतो. आंगावरील पुरळ टाकळ्याच्या बिया व पाला यांनीं बरा होतो. टेटुमूळ सह्याद्रीवर आढळतें. हें कडू असून पौष्टिक व अग्निवर्धक आहे. डाळिंबीचीं झाडें बागांत होतात. हिच्या मुळाची साल व फुलें अग्निवर्धक असतात. डोरलीचीं झाडें कोल्हापूरच्या सर्व भागीं शेतांत आढळतात. डोरलीच्या मुळाचा पोटशूळ, जंत आणि ताप यांवर उपयोग होतो.

तमालपत्र सह्याद्रीच्या डोंगरावर आढळतें. याच्या पानांचा उपयोग मसाल्याकरितां होतो. तरवडाचीं झाडें पश्चिमेकडील डोंगराळ जमिनींत असतात. याची साल शक्तिवर्धक आणि अवरोधक असते. तांदुळजा माळावर होते. याचा उपयोग विषारावर होतो. तालीमखान्याचें बीं परम्याच्या विकारांत शक्ति वाढण्याकरितां आणि मूत्रदाहाकरितां देतात. तिवस सह्याद्रीच्या बाजूवर आढळतो. याच्या सालीचा उपयोग परम्यावर व महारोगावर होतो. तुतीचीं झाडें बागांत होतात. याचीं फळें पित्तनाशक असतात. तुंब्याचीं झाडें पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशांत आढळतात. तुंबा हा सूक्ष्म उद्दीपक आहे. तुळस सर्वत्र असते. तुळशीच्या पाल्याचा व लिंबाचा रस मिसळून नारूवर देतात. तोंडलीचे वेल परसांत लावतात. याच्या पाल्यानें व मुळांनीं घर्दें बरीं होतात. दगडफूल पर्जन्यकाळीं दगडावर वाढतें. याचा सुवासिक पदार्थांप्रमाणें मुख्यत्वें उपयोग होतो. दर्भ, मोळ व देवनळ नदी किनारीं वाढतात. या तिहींच्या मुळ्यांचा काढा मूत्ररेच होण्याकरितां देतात. दवणा

बागांत असतो. मायेशल्यावर याचा उपयोग होतो. दुधवेलीच्या मुळांत रक्तशोधकाचे गुण आहेत, आणि याचा उपयोग संधिवायूवर व कफावर फार करितात. दुपारीचीं झाडें बागांत लावतात. हिचा पाला उद्दीपक आहे. दूर्वा सर्वत्र असतात. यांस आम्ल रुचि असते, आणि शिनारी आली असतां ती बंद करण्यास यांचा उपयोग करितात. देवकापूस बागांत होतो. याचीं कोंवळीं बोडें अफिणीच्या पाण्यांत भिजवून आमांशावर देतात. देवडांगीनें ओकारी येते. दोडक्याचा उपयोग रेचकप्रमाणें करितात. द्राक्षीचे वेल बागांत लावतात. वाळलेलीं द्राक्षें किंवा मनुका पोट साफ होण्याकरितां देतात. धणे शेतांत पिकतात. हे वातनाशक आहेत. धमासा पूर्वेकडील सपाट प्रदेशांत होतो. हा कडू असून अवरोधक आहे. धामणीचीं झाडें सह्याद्रीवर आढळतात. पित्तविकार झाला असतां अग्नि प्रदीप्त करण्याकरितां ह्यांचा उपयोग करितात. धायटीचीं झाडें पश्चिमेकडील डोंगरांत असतात. हिचीं फुलें उद्दीपक आहेत. धावड्याचीं झाडें सह्याद्रीच्या शिखरावर आढळतात. पंडुरोग, पित्त आणि थंडी यांवर याचा उपयोग होतो. धोत्रा सर्वत्र आढळतो. याच्या बिया वमनकारक आहेत. नागरमोथा शेतांत पुष्कळ असतो. याच्या मुळ्यांचा शक्ति वाढण्याकडे उपयोग करितात. नारळीचीं झाडें कोंकणांत असतात. कोंवळ्या नारळाचें पाणी मूत्रविकारावर देतात. निर्गुंडीचीं झाडें सर्वत्र आहेत. निर्गुंडीच्या पाल्याच्या अंगीं शोथघ्न म्हणजे सांचलेलें रक्त वगैरे पसरविण्याचे गुण आहेत. निंबाचीं झाडें सर्वत्र आढळतात. याच्या तीन जाती आहेत, व याचीं फळें महारोगावर उपयोगी पडतात. निवडुंगाच्या अनेक जाती आहेत, व ते सर्वत्र आढळतात. याचा रस मोठा सारक आहे.

पळस सर्वत्र आढळतो. मूत्र बंद झालें असतां पोटाखालचा भाग शेकण्याकरितां पळसाच्या फुलांचा कषाय घेतात. पाडळमूळ हें सह्याद्रीवर असतें. तापामध्यें दाह कमी होण्याकरितां यांच्या मुळांचा रस घेतात. पाथरी हें झाड पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशांत असतें. हें शिजवून खातात, व तापावरही देतात. पित्तपापडा पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशांत चार प्रकारचा आढळतो. हा शक्तिवर्धक व प्रकृतींत फेरबदल करणारा आहे. पिथदन हें झाड कोंकणांत आढळतें. हें शक्तिवर्धक आहे, आ-

परिशिष्ट (ब.)

औषधि वनस्पति.

प्ति थंडी झाली असतांही यापासून गुण येतो. **पिंपरी** सर्वत्र आढळते. खोकला थंडी व पित्त यांवर हिच्या सालीचा उपयोग होतो. **पिंपळ** सर्वत्र आढळतो याच्या २ जाती आहेत. खवल्यावर याच्या सालीचा द्रव देतात. **पिंपळी** कोंकणांत होते. फळ आणि देंट यांच्या आंगीं मसालेदार धर्म आहेत. **पेरूचीं** झाडें बागांत होतात; आणि पित्त झालें असतां यानें गुण येतो असें समजतात. **फणसाचीं** झाडें घराजवळ आणि बागांत असतात. पित्तावर याच्या सालीचा उपयोग होतो. **बकुळीचीं** झाडें सर्वत्र आढळतात. आणि याच्या आंगीं शक्तिवर्धक व अवरोधक गुण आहेत. **बडीशेप** शेतांत पेरतात. हिचे दाणे व मुळें, मुलांस आमांशावर देतात. **बदामाचीं** झाडें बागांत लावतात. शक्ति वाढण्याकरितां याचा उपयोग होतो. **बळाच्या** चार जाती आहेत, व हीं बागांत लावतात. याचीं मुळें अवरोधक व पौष्टिक आहेत. **बाभळीचीं** झाडें सपाट प्रदेशांत वाढतात. बाभळीची साल पौष्टिक व अवरोधक आहे. **बावचीचीं** झाडें पड व ओसाड जमिनींत आढळतात. हिचे बियांचा खरूज, खवडे व चट्टे वगैरे त्वचेच्या रोगांवर उपयोग होतो. **बाहवा** किंवा बाव्हा हीं झाडें सह्याद्रीवर आढळतात. आणि याच्या शेंगांचा मगज वीट न येण्याजोगा सारक आहे. **बाळंतशेपीचीं** झाडें शेतांत होतात. व त्याचा उपयोग संधिवायूवर करितात. **बिब्याचीं** झाडें सह्याद्रीवर आहेत, व त्याचीं मुळें स्फोटोत्पादक असतात. **बेलाचीं** झाडें सर्वत्र असतात, आणि हगवण व आमांश यांवर बेलफळांचा उपयोग होतो. **बेहड्याचीं** झाडें सह्याद्रीवर आहेत. कफ सुटण्याकरितां एक प्रकारचा लेह करण्यास याच्या बीजकोशाचा किंवा सालीच्या पुडीचा उपयोग करितात. **बोरबाडा** सर्वत्र आढळतो. त्याच्या सालीचा पांढऱ्या कोडावर उपयोग होतो. **बोरीचीं** झाडें जंगलांत आढळतात. अपच्या किंवा वीट आला असतां याच्या मुळांनीं जातो. **ब्रम्हीचीं** झाडें पाण्याच्या पाटांत आढळतात. या वनस्पतीच्या आंगीं मूत्रल गुण आहेत. **भारंगीचीं** झाडें शेताच्या कडांनीं आढळतात. हिच्या मुळ्या तापावर वाटतात. **भुइकोहळा** कोंकणांत आढळतो. याच्या मुळ्यांचा परम्यावर उपयोग होतो. **भोंकरीचीं** झाडें सर्वत्र आहेत. हिची साल सूक्ष्म अवरोधक आहे. **भोंपळीचे** वेल परड्यांत लावतात. हिच्या अशोल्या बिया ठाव नं-

त झाले म्हणजे सारखेरबरोबर खातात. **मंजिष्ट** पूर्वेकडील मैदानांत आढळते. याच्या मुळ्यांच्या अंगीं पचनींत चांगला फेरबदल करण्याचा गुण आहे. **मर्वा** बागांत लावतात. हा मसालेदार पौष्टिक आहे. **महाळुंगीचीं** झाडें बागांत लावतात. हिचें फळ मसालेदार कडू असतें. **माका** पाण्याच्या पाटांत आढळतो. विंचू चावला असतां चावल्या जागीं याचा रस लावितात. **माठ** बागांत लावितात. याच्या पाल्याची चांगली मसालेदार भाजी होते. **मिरवेलीचे** वेल कोंकणांत असतात. मिरें वातनाशक आणि अग्निदीपक आहेत. **मुंडीचीं** झाडें सर्वत्र आढळतात. **मुरुडशिंगीचा** संधिवातावर शेकण्यास उपयोग होतो. **मुळे** हे बागांत होतात. त्यांचा पाला व मुळें वद्धांवर उपयोगी पडतात. **मेथी** शेतांत होते, तिच्या बिया पौष्टिक असतात. **मोरदोंड** कोंकणांत आढळतो. त्याचा आमांशावर उपयोग होतो. **मोहाचीं** झाडें सह्याद्रीवर आहेत. मोहाच्या साली औषधाकरितां उपयोगी पडतात, व फुलांची दारू होते.

**रक्तरोड** सह्याद्रीवर आढळतो. याची साल पौष्टिक आहे. **रानमूग** व **रानउडीद** हे जंगलांत असतात. याचा पाला व बी या सर्वांचा उपयोग परम्यावर होतो. **रिंगणीचीं** झाडें शेतांत असतात. हें कफनाशक आहे, व याच्या मुळ्या मूत्रल आहेत. **रिठा** जंगलांत आढळतो. तो वमनकारक आहे. **रुई** चार प्रकारची आहे.ही सर्वत्र आढळते. तिचा रस उपदंशावर चालतो. **रोसेगवत.** बागांत कधीं कधीं आढळतें. याच्या मुळ्या व तेल संधिवाताच्या विकारावर देतात. **लसूण** बागांत होते. पोटदुखीवर हिचा उपयोग होतो. **लाजाळू** शेतांत आढळतें. याच्या मुळ्यांचा काढा मुतखड्यावर देतात. **लिंबाचीं** झाडें बागांत होतात. लिंबाचा रस ज्वरांत शीनकाईकरितां घेतात, व याची साल उत्तेजक आहे. **वड** किंवा **वटवृक्ष** सर्वत्र आढळतो. याच्या सालीचा रक्तकस आणि पित्त यांवर उपयोग करितात. **वधार** दिहीरींत वाढते. याच्या देंठांचा कडू पौष्टिक औषधाप्रमाणें आणि मधुमेह रोगावर उपयोग होतो. **वसू** पूर्वेकडील मैदानांत आढळते. याच्या अंगीं शामक गुण आहेत. **वांकेरीचें** भातें सह्याद्रीवर आढळतें. याच्या मुळ्या बळकट अवरोधक आहेत. **वांझकरटोळी** हें झाड माळावर उठतें. याचीं मुळें मूळव्याधीवर चालतात. **वाल** ओढ्याच्या कांठीं साढ्यतो. याची मुळें मसालेदार पौष्टिक आहेत. **वायडिंग** कोंकणांत आढळतें. याचीं फळें जंतांवर घेतात. **वाळकाचे** वेल बागांत ला-

वतात. याच्या बिया शीतक मूत्रल आहेत. विड्याच्या पानांचे वेल मळ्यांत होतात. याच्या पानांच्या अंगीं मसालेदार व अवरोधक गुण आहेत. विष्णुक्रांत डोंगराळ प्रदेशांत आढळतो. जखमा बऱ्या करण्यास आणि जनांवर याचा उपयोग करितात. वेखंडाच्या दोन जाती आहेत. व त्या बागांत होतात. याचा उपयोग अतिसारादिक विकारावर होतो. वेताचा बुंधा थंड पाण्यांत कुटून तो चलक उंदीर चावल्याठिकाणीं लावितात. वेलपाडळ कोंकणांत असते. आधणाच्या पाण्यांत याच्या मुळ्यांचा केलेला द्रव तापांत दाह कमी होण्यास पिण्यास देतात. वेळू सर्वत्र आढळतो. याच्या सांध्यांत वंशलोचन म्हणून एक पदार्थ सांपडतो, त्याचा उपयोग खोकला ताप आणि क्षयावर होतो.

शतावरीचें झाड सर्वच आढळतें व मुख्यत्वें कोंकणांत फार असतें. शमी सर्वत्र आढळते. हिचीं फळें व फुलें यांचा उपयोग खोकल्यावर होतो. शिकेकाई जंगलांत असते. याच्या शेंगांचा रेचका प्रमाणें उपयोग होतो. शिरस सह्याद्रीवरच्या जंगलांत असतें. याचीं फुलें करटें व दुसऱ्या सुजी यांवर लावतात, आणि डोळे आले म्हणजे त्या विकारावर याच्या पानांचा उपयोग होतो. शिवणीचीं झाडें सह्याद्रीवर आढळतात. याचा काढा पित्तापासून आलेल्या तापावर देतात. शिसव्याचीं झाडें सह्याद्रीवर आढळतात. यांचा उपयोग गर्भपातावर होतो. शेवग्याचीं झाडें सर्वत्र असतात. याच्या मुळाच्या सालीचा काढा मूतखड्याच्या विकारावर देतात. सफेद मुसळी आणि डुकरकंद पर्जन्यकाळीं सह्याद्रीवर वाढतात. या दोहोंचे कांदे पौष्टिक आहेत. सराटे जंगलांत असतात. याचीं पानें मुळ्या व बिया यांचा उपयोग परम्यावर होतो. सागाचीं झाडें सह्याद्रीवर आढळतात. याच्या बियांचा उपयोग मूत्ररेचक होण्याकरितां करितात, आणि विष उतला असतां तो बरा होण्यास लाकडाचा उपयोग करितात. सातविणाचीं झाडें जंगलांत आढळतात. अतिसारादिकांमध्यें आंतड्यांस शक्ति येण्याकरितां याच्या सालीचा उपयोग करितात. सालवण हें झाड कोंकणांत असतें ज्वरावर याचा उपयोग होतो. सांवरीचीं झाडें सर्वत्र आढळतात. सांवरीच्या सालीच्या उपयोग दंशावर होतो. व हिच्या रसास मोचरस म्हणतात. सुपारीचीं झाडें कोंकणांत असतात. हिच्या अंगीं अवरोधक गुण असतात. सुरपाचीं झाडें सह्याद्रीच्या डोंगरावर असतात. मूळव्याधीच्या विकारावर याच्या कळ्यांचा उपयोग होतो. हळद तीन प्रकारची बागांत करितात. ही पुष्टिकारक व अ-

निर्दीपक आहे. हल्लीं याचा उपयोग रक्तशुद्धीकरितां करितात. ढिंगणघेट भागाच्या सपाट प्रदेशावर आढळतें. याच्या फळांच्या अंगीं वमनकारक गुण आहेत. हिरड्याचीं झाडें सह्याद्रीवर आहेत. यांच्या अंगीं रेचक धर्म आहेत.

# परिशिष्ट (क.)

## मराठ्यांचीं आडनांवें.

परिशिष्ट (क.) मराठ्यांचीं आडनांवें.

मराठ्यांच्या आडनांवांची वर्णानुक्रमानें यादी.*

अंतराळे, अन्दाके, अल्पाटे, अवताडे, अवळकर, आगलावे, आडकारे, आडसूळ, आचले, आरवे, आहेरराव, इयाळकर, इंगवळे, इंगळे, इच्छू, इदूलकर, इपारे, उडुगे, उंद्रे, उपलकर, उपार, उक्षीकर.

कंक, कचरे, कणस, कदम, कवाडे, कमटे, कर्पे, कर्वलकर, कवडे, कांकडे, काटे, कांडर, काथकर, काथवटे, कांबळे, कामटे, कामेकर, काशिड, काळे, किरद, किरदेकर, किरदत्त, केंवडे, केंसरकर, केसरे, कोकाटे, कोडग, कोंडगे, कोर, कोलटे, कोळसे.

खरडेकर, खराडे, खळे, खले, खाकरे, खाडे, खांडेकर, खानविलकर, खांबकर, खालवडे, खिरसागर, खुळे, खेडर, खेडकडे, खेडक, खोपकर, खोले.

गरजे, गरड, गवस, गवसेकर, गवळी, गाईकवाड, गाजरे, गिजे, गिड्डु, गुजर, गुजाल, गुंजाळ, गेळे, गोजरे, गोरे.

घडशी, घाईळ, घाटगे, घारगे, घुमे, घुट्टगडे, घुरं, घुके, घोगाणे, घोगे, घोडके, घोरपडे, घोळप.

चव्हाण, चापटे, चावट, चाळखे, चिरवळे, चिभुक, चेंडे, चौधरे, छत्रे, जगताप, जगदाळे, जरापटे, जमदाडे, जमेदार, जरतारे, जाधव, जिंजुरदे, जितवडेकर, जुगदार, जुवेकर, जोशी, झांबरे.

टाकेकर, टमके, टाणेकर, टेपर, टोंबरे, डफळे, डसाळ, डेंगडे, डोंगरे, ढगे, ढेंकणे, ढेमरे, ढेरे, ढोपरे.

तनपुरे, ताकवडेकर, ताटे, ताडुगडे, ताडसरे, तांबडे, तावरे, तिकाडे, तिखे, तिंये, तिपचे, तिवडे, तेलवेकर, तोदर, तोरस्कर, तोरे, थोरवोले, थोरवट, थोरात, दंडवते, दगडे, दळवी, दाइंगडे, दाढभाडे, दाभाडे, दिंडे, दिवंधेकर, दुबळ, दुबरे, देवकर, दोडफडे, धनवडे, ध-

---

* रावसाहेब उकचंद गजानन [illegible] संस्थान [illegible] यांनीं दिलेल्या माहितीवरून ही यादी तयार केली आहे.

धुरपे, धमदेरे, धाद्रगुडे, धाडगडे, धाटव धुमाळ, धुळप, ननवरे, नलगे, नलावडे, नवार, नाईक, नागटिळक, नाटळे, नाडके, नाल्हे, निकम, बिगवेकर, निनवडे, निपरूळ, निंबाळकर, नोगदंड.

पउळे, पगाडे, पडळकर, पडवळे, पडियार, पंडित, पन्हाळे, परन, पवार, पाथम, पाचुंदकर, पाटणकर, पाताडे, पांदरे, पांबर, पायगन, पाळकर, पालव, पिंगळे, पिंपरे, पिसाळ, पुलुगड, पेंढारी, पोटे, पोल्हळे, फडतरे. फराटे, फत्तलकर, फाकडे, फावडे.

बडड, बरगे, बरगुले, बाकर, बागळ, बाटे, बाड, बाडळ, बांडे, बाबर, बावर्चीकर, बावटकर, बावळे, बिचारे, बिचुकले, बिटके, बिनीकर, बिरमणे, बुरसे, बेडगे, बेलांडे, बोकडे, बोगर, बोटे, बोडे, बोराडे.

भाकड, भागट, भाटमारे, भाडिरगे, भापकर, भामे, भिडुगडे, भिंगारी, भिलारे, भुईकर, भुजबळ, भुजवर, भोइटे, भोगप्र, भोज, भोर, भोराळे,

मगर, मंडलिक, मनव्हे, मरगळे, मरडे, मस्के, महागुरे, महाडिक, मांडगुळे, मांडवकर, मांडवेकर, माणे, मारेकरी, मालुसरे, मिसाळ, मुडेकर, मुदडे, मुळिक, मेथे, मोरबाळे, मोहिते, मोळे.

यादव, येकरे, येवले.

रकटे, रडनांडे, रणदिवे, रणनवरे, रणसिंग, रवडे, रसाळे, रवळदे, राऊत, राजगिरे, राजमाने, राणे, रायजाप, रेडेकर, रेडाळकर, रोदे.

लकडे, लघाटे, लवाटे, लहरे, लागवणकर, लाटवडे, लाड, लांडगे, लांडे, लावंड, लुगडे, लुंगसे, लोंढे, लोंबटे.

वगरे, वाइमडे, वांकडे, वाघ, वाघमारे, वाडकर, वाडिंगे, वाणारे, वारंगे, वाळेकर, विचारे, वीर, वेलवणकर.

शंकर, शनफळे, शितोळे, शिंदे, शिपलकर, शिरके, शिरसवडे, शेंडे, शेलार, शेवाळे, शेळके.

सनाळे, सन्मुख, सलगर, सवाशे, सांगळे, सांटे, सातपुते, सातळ, सावळे, सारंग, सालिम, सावंत, साळवी, साळोखे, सिस्ते, सुपळ, सुपेकर, सुर्य, सुरवंशी, सेराडे, सोरमुळे, सोनुगडे, सोमासे, सोले.

हगवणे, हजारे, हांडे, हिंगे, हिनापे, हिमणे, होताळे.

मराठ्यां मधील साधारण देवकें किंवा लग्नसंबंधीं देवता पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत. (१) दगडी आणि समुद्रमर्यादा यांचे वेळ. (२) वटवृक्ष. (३) पंकनिसाचेंफळ. (४) कमळ. (५) सूर्यकांत आणि मंदार यांचीं फुलें. (६) कुंभारकुकडें आणि मोर यांचीं पिसें. (७) पांच पालवी आणि (८). तरवारीची धार.

# परिशिष्ट (ड.)

## भूतपिशाच बाधा.

परिशिष्ट (ड.)

भूतपिशाच बाधा.

कोल्हापूर प्रांतीं एखादा रोगी किंवा आजारी मनुष्य याचें डोकें हुक्कासारखें लाल झालें, किंवा मादक पदार्थ सेवन केल्यासारखें तारवटलेलें दिसूं लागलें, किंवा जर त्यास पेटके येऊं लागले, व तो एकसारखा ओरडूं किंवा रडूं लागला, किंवा फार बोलूं लागला, किंवा कित्येक दिवसपर्यंत मुळींच त्यानें बोलणें सोडलें, किंवा कांहीं विचारल्यास शिव्या देऊं लागला, किंवा त्यानें कित्येक दिवस अन्न वर्ज केलें, अगर अतिशय खाऊन भूक भूक म्हणूं लागला, केंश मोकळे सोडूं लागला, आपले आंगास इकडे तिकडे झोले देऊं लागला, त्यास मूर्छा आली अगर त्याचें आंग आखडलें, किंवा तो रक्त ओकूं लागला, तर त्यास भूतबाधा झाली असें म्हणतात.

कोल्हापूरचे लोक भुतांचे दोन वर्ग करितात. (१) घरचें भूत आणि (२) बाहेरचें भूत. ज्या घरचें भूत असेल त्या घरच्या किंवा कुटुंबांतल्या माणसांस मात्र त्याची बाधा होते. कुटुंबांतील जो एखादा मनुष्य आपल्या इच्छा तृप्त न होतां मरण पावला असेल, तोच बहुधा भूत होऊन कुटुंबास पीडा करितो. दिसण्यांत व स्वभावांत तें भूत मृतमनुष्या सारखेंच दिसतें. मुख्य बाहेरचीं भुतें खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत. (१) वेताळ. (२) अळवंटीण. (३) अस्र (४) ब्रम्हपुरुष. (५) चंडकाई. (६) चुडेल. (७) येलमकळसाई. (८) फिरंगी. (९) गिर. (१०) जरवीण. (११) खवीस. (१२) काळकाई. (१३) म्हसोबा. (१४) महिषासूर. (१५) महावीर. (१६) मुंजा. (१७) रूर आणि (१८) झोटिंग. हीं भुतें हवेंत, झाडांवर, नदीतळ्यानजीक, नद्यांच्या संगमावर आणि रस्त्यांच्या तिकटीवर असतात, असा लोकांचा समज आहे. हीं भुतें रात्रींचीं फार फिरतात. जेव्हां एखादा फिरस्ता भुतांच्या जवळून जातो, तेव्हां भूत मनुष्याचें रूप धारण करितें, आणि एकाएकीं तें रूप बदलून एका भयंकर क्रूर जनावराचें रूप घेऊन त्यास इतकें भिववून टाकितें कीं, भूत आंगावर चालून आल्यास त्याचा प्रतिकार किंवा अडथळा त्याच्यानें करवत नाहीं.

परिशिष्ट (ङ.) भूतपिशाच बाधा.

वेताळ हा भूतपिशाचांचा राजा आहे. त्याचें शरीर व अवयव मनुष्यासारखेच असतात. फक्त त्याचे हात व पाय उलटे असतात. त्याचे डोळे पिंगट व हिरव्या रंगाचे असतात, व केंश उभे असतात. तो आपल्या उजव्या हातांत वेत व डाव्या हातांत शंख धारण करितो. जेव्हां तो फेरीस जातो, तेव्हां हिरवा पोषाख करून पालखींतून किंवा घोड्यावरून फिरतो. कांहीं भुतें त्याच्या आघाडीस व कांहीं पिच्छाडीस असतात. सर्वांच्या हातांत पेटलेल्या मशाली असून तीं आरोळ्या ठोकतात. जी हिंदू स्त्री बाळंतपणांत मरून भूत होते, तिला अल्वंतीण म्हणतात. अशा ७ आहेत व त्या ब्राम्हण बायकांप्रमाणें दिसतात. प्रत्येक निरनिराळ्या रंगाचा पोषाख करिते. हीं भूतें नदीच्या व वड्याच्या कांठीं बहुधा फिरतात. व ज्यांस हीं लागतात, तीं मनुष्यें नेहमी पाण्याकडे पळतात. मुसलमानांतले परीस व हीं भूतें एकच आहेत. विवाहित ब्राम्हण मरून भूत झाला, म्हणजे त्यास ब्रम्हसमंध म्हणतात. तो लंगोटी घालतो, खांद्यावर एक वस्त्र घेतो, व डोक्यास दोरी घालतो. ओसाड घरांत, स्मशानांत आणि नदी किनारीं हा असतो. हा क्वचित लोकांस बाधा करितो. परंतु याची कधीं कोणास बाधा झाली तर ती दूर करणें फार दुरापास्त असतें. चंडकी किंवा चंडकाई ही हलक्या हिंदू लोकांमधील पिशाचदेवता आहे. ही पाण्याच्या किंवा दलदलीच्या जमिनीपाशीं राहते, आणि २पासून १२ वर्षांच्या मुलांस हिची बाधा होते. चंडकाईची बाधा मुलास होऊन आंचके किंवा पेटके येऊं लागले म्हणजे मुलाचे आईबाप नदीच्या दोहों किनाऱ्यांची माती आणून त्या मातीची चंडकाईची मूर्ति करितात, आणि गंध, गुलाल व फुलें घालून तिची पूजा करून पाण्यांत टाकितात. मुसलमान बायको बाळंतपणांत मेली म्हणजे तिचें चुडेल हें भूत होतें. येलमक्कळताई हें भूत कोल्हापूर शहरांत मात्र आहे. हा कानडी शब्द असून याचा अर्थ 'सात मुलांची आई' असा आहे. हल्लीं ज्या ठिकाणीं कोल्हापूर शहर वसलें आहे, त्या ठिकाणीं राक्षसांचें वास्तव्य होतें, आणि ते आपल्या जाग्यावर शहर वसवूं देण्यास राजी नव्हते. विद्वान पंडिताच्या सल्यानें त्या ठिकाणच्या पिशाचांस संतुष्ट करण्याकरितां शहराच्या तटाच्या भिंतीखालीं एका कोरवी जातीच्या सात मुलांच्या आईस पुरलें होतें. या बाईचें जें भूत झालें त्यास येलमक्कळताई असें म्हणतात. ही कोल्हापूर शहरांत फिरते, आणि लाल लुगडें व चोळी नेसलेली असून तिच्या सभोंवार ७ मुलें खेळत आहेत, अशी कोरवी जातीच्या स्त्री सारखी कधीं कधीं दृष्टीस पडते.

परिशिष्ट (ङ.)

भूतपिशाच [illegible]

जेव्हां एखाद्या घरांत किंवा कुटुंबांत हिचा प्रवेश होतो, तेव्हां त्या कुटुंबांतील धान्याचा साठा नाहींसा होतो, गुरांस रोग होतो, आणि दुधास कोणी येत नाहीं. युरोपिअन मनुष्य आपल्या कांहीं इच्छा पूर्ण न होतां मेला तर त्याचें जें भूत होतें त्यास फिरंगी म्हणतात. तो मेलें पुरण्याच्या स्मशानांत नेहमी फिरतो, आणि सर्व जातीच्या व धर्माच्या लोकांस त्याची बाधा होते. त्याची बाधा झाली म्हणजे ती दूर करणें फार कठीण असतें. हुशार असा मुसलमान पंचाक्षरी असला, तर तो मात्र फिरंगीची बाधा दूर करूं शकतो. बुडून मेलेल्या मुसलमानाच्या झालेल्या भुतास गिर म्हणतात. दुसऱ्या हलक्या मर्तांच्या भुतांप्रमाणें हा अनेक रूपें धारण करितो, व लोकांस फसवितो. हा बहुतकरून पाण्याजवळ राहतो. जे त्याच्या तडाक्यांत सांपडतात, त्यांस तो पाण्याकडे नेऊन त्यांत बुडवितो. हा कोंकणांत फार आढळतो. परंतु कोल्हापुरांत क्वचित् कधीं तरी याची बाधा होते. विवाहित हिंदु स्त्री बाळंतपणांत किंवा आपली कांहीं इच्छा पूर्ण न होतां मेली म्हणजे ती जखीण होते. ती पिवळें लुगडें नेसते, पिवळी चोळी घालते. आणि तिचे केश पाठीवर लोंबत असतात. स्नानाच्या व स्वयंपाकाच्या जाग्यांत ती येते, आणि आपल्या नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोस व तिच्या मुलांस पीडा करिते. आणि आपल्या सवतीच्या हातांतून आपल्या मुलास काढून घेण्याकरितां आपल्या मुलासही कधीं कधीं पीडा करिते. कधीं कधीं मुलांस त्यांच्या आयांपासून पळवून नेते, आणि कित्येक दिवसांनंतर आणून देते. विद्वान मुसलमान मरून जें भूत होतें त्यास खवीस म्हणतात. मुसलमान मुल्ला असतो त्यासारखा हा खवीस दिसतो. याचे केश पाठ उभे असतात, व हा हुंगन झाडाच्या फांद्या घेतो. तो झाडावर किंवा ओसाड घरांत राहतो. आणि हा कोणास लागला तर मुसलमान पंचाक्षरी मात्र त्यास घालवूं शकतो. काळकाई, म्हसोबा, महिषासुर आणि महावीर हे हलक्या जातीच्या लोकांचे किंवा आधारदैवत आहेत. हे आपल्या भक्तांच्या शत्रूंस किंवा जे आपल्या भक्तांस उपद्रव देतील, त्यांस मात्र पीडा करितात. जेव्हां एखादा कुणबी हिंदु आपल्या शत्रूंस यांपैकीं कोणी तरी उपद्रव द्यावा असें इच्छितो, तेव्हां तो पुजाऱ्याकडे जाऊन देवास काय पाहिजे आहे तें विचारण्यास सांगतो. आणि तें कळलें म्हणजे असा नवस करितो कीं, आपल्या मनाजोगी गोष्ट घडून आल्यास मी देवास नारळ, कोंबडा, बकरा किंवा ओला नैवेद्य देईन. देवाची इच्छा समजण्याकरितां पुजारी देवास प्रसाद लावितो. प्रसाद लावण्याकरितां दोन फुलें घेऊन पाण्यांत भिजवितो. आणि देवाच्या छातीवर ए-

परिशिष्ट (ङ) भूतपिशाच बाधा.

क उजव्या बाजूस व एक डाव्या बाजूस अशीं तीं फुलें डकवून देवास सांगतो कीं, जें आमच्या मनांत आहे, तें करण्यास तूं राजी असशील तर अमुक कडचें फूल मथम दे. फुलाचें पाणी सुकलें म्हणजे फुलें पडतात. जर डावें फूल मथम पडलें, तर इच्छित कार्य करण्यास देव राजी नाहीं, आणि उजवें पडलें तर देव राजी आहे; असें समजतात. अमुक करण्यास राजी आहें, असें देवानें सांगितलें म्हणजे मसाद लावण्यास सांगणारा मनुष्य देवाच्या धुपारतींतील आंगारा घेऊन ज्यास उपद्रव देण्याची त्याची इच्छा असते, त्याच्या आंगावर किंवा त्याच्या घरांत तो आंगारा टाकितो. यानंतर तो आजारी पडला, किंवा त्यावर एखादें संकट आलें, तर देव पावला असें समजून ज्यानें देवास पीडा करण्याकरितां प्रार्थना केली असेल, तो देवळांत जाऊन नारळ फोडतो, बकरा मारतो, नैवेद्य करितो अगर खेड्याच्या लोकांस जेवावयास घालितो. जर त्यानें नवस फेडला नाहीं, किंवा देवाच्या नांवानें जेवण घातलें नाहीं, तर देव त्यास उलटून पीडा करितो. जेव्हां कोणी आजारी पडतो किंवा त्यावर एखादें संकट येतें, तेव्हां तो समजतो कीं, आपल्यावर कोणी तरी भूत किंवा पिशाच किंवा देव सोडला आहे. नंतर तो पंचाक्षऱ्याकडे जाऊन त्यास सांगतो कीं, कोणी शत्रूनें मजवर भूत घातलें आहे, व तें मला पीडा करीत आहे. कोणी व कोणतें भूत घातलें हें पंचाक्षरी त्यास सांगतो, आणि मंत्रविलेलीं अक्षरें लिहून एक कागद त्यास गळ्यांत बांधण्यास देतो. यानें जर त्यास गुण आला, तर जो देव त्यास पीडा करीत होता, त्या देवाच्या देवळास जाण्याच्या रस्त्यावर जत्रा भरविण्यास आणि देवाच्या नांवानें जेवण घालण्यास त्यास पंचाक्षरी सांगतो. ब्राम्हणाचा मुलगा मुंज होऊन सोडमुंज होण्यापूर्वी मेला, म्हणजे त्याचें जें भूत होतें, त्यास मुंजा म्हणतात. मुंजा बहुतकरून पिंपळाच्या झाडावर राहतो. मुख्यत्वें ब्राम्हणांस पीडा करणें मुंजास फार आवडतें. तो फार क्रूर रीतीनें त्यास छळतो; कधीं कधीं त्यांच्या आंगास विस्तव लावून त्यांस भाजतो, किंवा त्यांस वांझ करितो. मुंजापासून ज्यांस उपद्रव होतो, ते त्यास तृप्त करण्याकरितां पिंपळास पार बांधितात, आणि त्याच्या सभोंवतीं सूत गुंडाळतात. मुसलमान आपली इच्छा तृप्त न होतां मेला म्हणजे त्याचें जें भूत होतें, त्यास सुर म्हणतात. तो मुसलमानाच्या घरांत मुख्यत्वें स्नानाच्या व स्वयंपाकाच्या जाग्यांत संचार करितो. तो स्वभावानें व रूपानें बहुतेक खवीसासारखाच असतो. नीच जातीचा हिंदु आपली इच्छा तृप्त न होतां मेला म्हणजे त्याचें झोटिंग

परिशिष्ट (ड.)

भूतपिशाच बाधा.

हे भूत होतें. हा आंगावर कपडे घेत नाहीं व केश मोकळे सोडितो. तो आपल्याच घरीं राहतो, परंतु जर घर पडलें असलें अगर जळलें असलें तर नदी किनारीं किंवा विहिरीच्या कांठीं तो जातो. पवित्र स्थानीं जाण्यास, किंवा वेदविद्येंत निष्णात किंवा धर्माचरणानें जे वागतात अशा पुरुषांस स्पर्श करण्यास त्यास भीति वाटते.

जे लोक आपल्या इच्छा तृप्त न होतां मरतात, उदाहरणार्थ अविवाहित स्त्री किंवा बाळंत झालेली स्त्री; अगर आपल्या अत्यंत प्रीयकर वस्तु मागें ठेवून मरतात, उदाहरणार्थ तान्हें मूल मागें ठेवून स्त्री मरते, किंवा कृपण आपला ठेवा मागें ठेवून मरतो, असे लोक मेल्यावर त्यांस विश्रांति मिळत नाहीं; आणि ते पुनः परत येऊन जिवंत माणसांस पीडा करितात. असा लोकांचा समज आहे. अतृप्त मृत मनुष्यांनीं पीडा करूं नये, म्हणून जिवंत विशेष प्रकारें त्याचें क्रियाकर्मांतर करितात. शरीरावर शेणाच्या किंवा दर्भाच्या मूर्ति करून जाळतात आणि बाळंतीण किंवा तान्हें मूल असलेली स्त्री मेली तर तिचीं सर्व किंवा कांहीं वस्त्रें व दागिने ब्राह्मणाच्या बायकोस देतात. बाळंत होतांना एखादी स्त्री मेली तर तिचें भूत होऊन पुनः परत येऊं नये म्हणून ज्या रस्त्यानें तिचें प्रेत स्मशानांत नेतात, त्या रस्त्यावर राळ्याचे दाणे टाकितात. घरच्या भुतांस घालविण्याचा दुसरा एक कोल्हापुरांत विधि करितात, पंचाक्षऱ्याकडून मंत्रविलेला कागद घेऊन तो एका मातीच्या भांड्यांत घालतात. व तें भांडें त्या मनुष्यास ज्या ठिकाणीं जाळलें असेल तेथें पुरतात. कित्येक वेळां मंत्रविलेले खिळे उमऱ्यांत मारतात, आणि मंत्रविलेलीं लिंबें, भांडीं व खिळे घराच्या चोहीं कोंपऱ्यांस पुरतात.

कोणास भूतबाधा झाली असें वाटलें म्हणजे अनेक घरचे उपाय करितात. विस्तव घेऊन त्यावर कांहीं केश आणि मिरें किंवा मोहऱ्या टाकितात, आणि भूत लागलेल्या मनुष्याचें डोकें कांहीं मिनिटें त्या धुरावर धरून त्यास धुरी देतात. या व दुसऱ्या उपायांनीं जर भूत गेलें नाहीं, तर भूत लागलेल्या मनुष्यास पंचाक्षऱ्याकडे नेतात. कोल्हापूर प्रांतीं पंचाक्षऱ्यास देवऋषि, मंत्री, किंवा पंचाद (?) असें म्हणतात. ज्यास एखाद्या पिशाचाची व रक्षक देवतेची प्रेरणा होते, त्यास देवऋषि म्हणतात. तो भूत काढण्याची विद्या शिकत नाहीं, परंतु ती त्यास रक्षक देवतेच्या आराधनेनें प्रसन्न (?) होऊन मिळते; आणि ती देवता देवऋषीनें बोलाविलें म्हणजे त्याच्या आंगांत संचार करिते. मंत्री हा बहुतकरून पं-

पंचाक्षरीविद्या गुरूपाशीं शिकतो. देवऋषि व मंत्री हे हिंदु असतात. वस्ताद मुसलमान असतात. वस्तादही ही मंत्रविद्या गुरूपासूनच संपादन करितात. हिंदु व मुसलमान पंचाक्षऱ्यांस कांहीं नित्य नियम पाळावे लागतात. उदाहरणार्थ जर हिंदु पंचाक्षरी जेवीत असतां खोलींतील दिवा गेला, किंवा शिवूंनयेशा स्त्रीनें बोलतांना त्यानें ऐकिलें, किंवा त्याचे खोलींत कोणी झाडूं लागला, किंवा कोणी भुताचें नांव घेतलें तर त्यास जेवण टाकून उठावें लागतें. व बाकीचा सर्व दिवस त्यास उपास करावा लागतो. पंचाक्षऱ्यास कित्येक भाज्या व फळें वर्ज करावीं लागतात. तसेंच शिळें किंवा दोन वेळ शिजविलेलें अन्न त्यास खातां येत नाहीं. मुसलमान पंचाक्षरी उडीद खात नाहींत. कारण उडदांस भुतें फार भितात. तसेंच शिवूंनयेशा स्त्रीनें शिजविलेलें अन्न किंवा मांस त्यास खातां येत नाहीं.

भुतें काढण्याकरितां किंवा भूतबाधा घालविण्याकरितां हिंदु आणि मुसलमान पंचाक्षरी निरनिराळे उपाय योजितात. परंतु दोघांच्याही उपायांचा सारखाच चांगला परिणाम होतो. साधारण नियम म्हटला म्हणजे हिंदु पंचाक्षरी हिंदू भुतें घालवितात, व मुसलमान पंचाक्षरी मुसलमान भुतें घालवितात. कोल्हापूर प्रांतांतील बहुतेक हिंदुपंचाक्षरी देवाचे गुरव आहेत. पंचाक्षरी पुरुष असतात. किंवा बायकाही असतात. परंतु अस्व किंवा अलवंतीण हीं भुतें काढावयाचीं असलीं म्हणजे बायकांसच बोलावितात. बायका पंचाक्षरी असल्या म्हणजे त्यांच्या आंगांत त्यांच्या माहितीचें एखादें पिशाच संचार करितें, आणि कोणतें भूत लागलें आहे, आणि त्यास काढून टाकावयास कोणते उपाय योजिले पाहिजेत, हें सांगतें. नेहमीचा पहिला उपाय म्हटला म्हणजे नदीकिनारीं किंवा विहिरीजवळ जेथें भूत राहत असतें तेथें शिजविलेलें अन्न ठेवितात. जेव्हां भूतबाधा साधारण असते, तेव्हां पिशाचाचा उपद्रव होऊनये म्हणून एक ताईत म्हणजे तांब्याची किंवा रुप्याची पेटी गळ्यांत बांधण्यास देतात. ताइतांत गुप्त मंत्रविलेलीं अक्षरें लिहिलेला एक कागद असतो. कधीं कधीं काळें, तांबडें, पिंवळें पांढरें आणि हिरवें अशा पांच रंगाच्या रेशमाचा दोरा दंडावर किंवा गळ्यांत बांधण्यास देतात. या दोऱ्यास सात गांठी असतात, आणि त्या गांठींत मंत्रविलेले मराठी किंवा हिंदुस्थानी शब्द लिहिलेला एक कागद किंवा भुर्जपत्र बांधलेलें असतें. घरचीं व बाहेरचीं भुतें घालविण्याची रीत एकच असते. भुतें काढण्याचीं खालीं दोन उदाहरणें दिलीं आहेत, त्यांवरून कोल्हापूर प्रांतीं भुतें काढण्याकरितां जे साधारण उपाय योजितात त्याची अटकळ होईल.

परिशिष्ट (ड.)

भूतपिशाच्च बाधा.

(१) कोल्हापूर पोलीस पैकीं हेडकान्स्टेबल रामा याची बायको शिता सुमारें २५ वर्षं वयाची एके दिवशीं आपल्या मुलास घेऊन संध्याकाळीं कोल्हापूरच्या दक्षिणेस फिरंगाईच्या देवळा नजीकच्या पावळाच्या तव्यावरून जात होती. नव्या जवळून जातांना ती ठेंच लागून पडली, आणि तिच्या डोक्यावर शेणीची बुट्टी होती, ती सांडली. घाईघाईनें धरडून बुट्टींत तिनें शेणी भरल्या आणि ती घरीं गेली. घरीं गेल्यावर 'मी तव्याजवळ पडल्यें, व मला फार भय वाटलें.' असें तिनें आपल्या नवऱ्यास व घरच्या माणसांस सांगितलें. चार दिवस पर्यंत तिला कांहीं झालें नाहीं. पांचव्या दिवशीं ती घरीं असतां कोणी दरवाज्यांत आला आणि 'शिता, शिता' अशी तिला हाक मारिली. म्हणून ती पाहण्यास बाहेर गेली, परंतु दरवाज्यांत कोणी दृष्टीस पडलें नाहीं. कांहीं वेळानें पुनः तिला कोणी हाका मारिल्या; येणें करून ती फार भ्याली. नंतर तिनें हा प्रकार शेजाऱ्यास सांगितला, तेव्हां त्यांनीं घर सोडून जाऊं नको, असें तिला सांगितलें. कित्येक दिवस पर्यंत याप्रमाणें तिला कोणी हाका मारीत असे, आणि कधीं कधीं तिला वाटे कीं, घराच्या झरुक्यांत कोणी तरी उभा आहे. ही तिची रोजची रड ऐकून एके दिवशीं तिचा नवरा घरीं राहिला. तेव्हां त्यानेंही त्या दिवशीं 'शिता, शिता' अशा अनेक वेळा हाका ऐकिल्या, व त्यावेळीं त्यास फार आश्चर्य वाटलें. एके दिवशीं त्यानें झरुक्यांत माणसाची आकृति पाहिली. तेव्हां त्याची खात्री झाली कीं, कोणी तरी पिशाच्च घराभोंवतीं घिरट्या घालीत आहे. भुतास घालविण्याकरितां त्यानें पुष्कळ यत्न केले. राख मंत्रवून घरांत जिकडे तिकडे त्यानें टाकिली. गाईचें गोमूत्र जमिनीवर व भिंतीवर त्यानें शिंपडिलें, तथापि भूत घराजवळून गेलें नाहीं, आणि शिता शिता अशा हाका मारण्याचा त्यानें तसाच क्रम चालविला. याप्रमाणें शिता सहा महिन्याची गरोदर होती ती नऊ महिन्याची होईपर्यंत असाच क्रम चालविला. आणि या तीन महिन्यांत शिता अगदीं रोडून जाऊन निस्तेज झाली. नंतर ती लवकरच सुखरूपपणें बाळंत झाली. पहिले १५ दिवस तिला कांहीं विशेष झालें नाहीं. परंतु सोळाव्या दिवशीं एकाएकीं तिच्या आंगांत आलें. ती बाजेवर पडून हूं-हूं करी, परंतु विचारलें असतां कांहीं उत्तर देईना. तिच्या हातापायांत पेटके येऊं लागले, ती मुलास पाजीना, व दुसऱ्या रीतीनेंही जपेना. लोकांस वाटलें कीं तिला कांहीं रोग झाला म्हणून त्यांनीं तिला कांहीं औषधें दिलीं, परंतु त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. तेव्हां त्यांनीं अनुमान केलें कीं, शि-

तेचा आजार कोणा तरी पिशाचापासून असावा. कृष्णा गुरव या नांवाच्या एका पंचाक्षऱ्यास त्यांनीं बोलाविलें. पंचाक्षऱ्यानें येऊन शिते-पुढें विस्तव पेटविला, त्यावर धूप घातला, आणि, धुपाच्या धुरावर शितेचें डोकें धरून मंत्र म्हणूं लागला. कांहीं वेळानें शिता किंवा तिच्या आंगांतील भूत हिंदुस्थानी भाषेंत या प्रमाणें बोलूं लागलें.' मी जाणार नाहीं. आपल्या करितां मी या स्त्रियेस ठेवीन.' तेव्हां गुरवानें दोन कागदाचे तुकडे घेतले, व त्यांवर वेताळाचें चित्र, त्याचा वेत्रदंड व त्याचा शंखतुरा काढून मंत्र म्हटले, आणि ते शितेच्या तोंडाजवळ नेऊन जाळले. हें करतांच शिता म्हणाली." असें करूनका, मंत्राचा उपयोग मजवर करूनका. मी या स्त्रियेस सोडून जातों. मी एक परदेशी शिपाई आहें. २१ व्या पलटणींत मी शिपाई होतों, आणि ती पलटण जेव्हां बिथरली, तेव्हां मी मारला गेलों. गावळाच्या तळ्याजवळ मी या स्त्रियेस पाहिलें, व तिच्या आंगांत संचार करण्याचें माझ्या मनांत आलें. या करितां मी तिला रस्त्यांत पाहिलें. नंतर वारंवार या घरीं येऊन तिला तिच्या नांवानें हाका मारिल्या. परंतु आतां मी तिला सोडितों. शिता पडली त्या ठिकाणीं मला भात, पोळी, लोणी आणि केळीं यांचें जेवण द्या." या प्रमाणें जेव्हां तिचें किंवा तिच्या आंगांतील भुताचें बोलणें संपलें, तेव्हां शिता बाजेवरून उठून घरांतून बाहेर गेली, आणि जमिनीवर डोकें टेंकिलें, त्याबरोबर तिच्या आंगांतील भूत गेलें. गुरवानें चार लिंबें आणून तीं मंत्रिलीं, आणि त्यांपैकीं एक लिंबू तिच्या लुगड्याच्या पदरांत बांधून तिच्या नवऱ्यास सांगितलें कीं, ती अगदीं बरी होईपर्यंत तिच्या पदरचें लिंबू नसेंच ठेव. बाकी तीन लिंबें घराच्या तीन दारांपुढें पुरलीं. असें केल्यावर शिता घरांत गेली, व बाजेवर अगदीं मूर्च्छित होऊन पडली. परंतु एक दोन दिवसांत ती सुधरूं लागली. आणि आठ दिवसांत अगदीं बरी झाली. तिच्या नवऱ्यानें भुतानें सांगितल्याप्रमाणें जेथें शिता पडली होती. त्या ठिकाणीं भात, पोळी, लोणी, आणि केळीं वगैरे ठेविलीं, आणि तेव्हांपासून त्या शिपायानें त्याच्या बायकोस कधींही उपद्रव दिला नाहीं.

(२) सुमारें ८ वर्षांपूर्वीं सुमारें १५ वर्षें उमरीचा गोविंदा नांवाचा शिंपी आपल्या बायकोस माहेराहून कोल्हापुरास आणीत होता. वाटेंत थकव्यामुळें विश्रांती घेण्याकरितां उत्तरा नदी किनारीं बसली असतां गोविंदानें आपल्या बायकोच्या गळ्यांत कांहीं पाहिलें, तेव्हां त्यानें तें काय आहे म्हणून तिला विचारिलें. तेव्हां तिनें सांगितलें कीं, भुतां खेतांची बाधा होऊनये म्हणून एका भल्या मनुष्यानें दिलेला हा ताईत आहे. गोविंदा

परिशिष्ट (ड.)

भूतपिशाच बाधा.

हांसला. त्यानें तो ताईत काढून घेतला, व त्यावर जोड्यानें मारून त्याचे तुकडे तुकडे केले, आणि नदींत फेकून दिले. तीं इसम यतां कोल्हापुरास पोंचल्यावर गोविंदा बरळूं लागला, रस्त्यांत धांवूं लागला, आणि वेड लागल्याचीं दुसरींही चिन्हें दिसूं लागलीं. त्याला पुष्कळ औषधोपाय केले, परंतु गुण येईना. कित्येक दिवस गेल्यावर शेखमहंमद या नांवाच्या एका मुसलमान पंचाक्षऱ्यास गोविंदाच्या घरीं बोलाविलें. गोविंदास आपून पंचाक्षऱ्यापुढें बसविलें. पंचाक्षऱ्यानें एक कागदाचा कपटा घेऊन त्यावर एक कारकोन चौकोन काढिला. आणखी आडव्या उभ्या रेषा काढून त्याचे अनेक विभाग केले. आणि त्यांत, १, २, ३, ४ असे अंक भरिले, व एका विभागांत शून्य काढिलें. गोविंदास तो कागद दाखवून ज्या ठिकाणीं शून्य काढिलें होतें, तें पाहात राहण्यास त्यास सांगितलें. या प्रमाणें गोविंदा त्याकडे पाहूं लागतांच त्याच्या आंगांतील पिशाच म्हणालें. "या बायकोचें रक्षण करण्यास मला सांगितलें असून मला एका ताइतांत घालून हिच्या गळ्यांत बांधिलें होतें. या मनुष्यानें मला बाहेर काढून जोड्यांनीं मारिलें, व पाण्यांत टाकून दिलें. ज्यानें माझा असा उपमर्द केला त्यास मी कधीं सोडणार नाहीं." नंतर पंचाक्षऱ्यानें पांच कागदाचे तुकडे घेऊन त्यावर मंत्राक्षरें लिहिलीं. आणि ते पांच तुकडे पांच फडक्यांवर ठेवून त्याच्या पांच सुरळ्या केल्या, व त्यास पेटवून त्या त्यानें गोविंदाच्या नाकापुढें धरिल्या. त्याच्या नाकांत धूर जातांच गोविंदा ओरडला कीं 'मी यास सोडून जातों.' तेव्हां भुतास काय पाहिजे म्हणून विचारलें, तेव्हां त्यानें सांगितलें कीं "कांहीं बांडी दारू, गांज्या आणि बकऱ्याचें काळीज असें ज्या नदींत ताईत टाकिला त्या नदीजवळ ठेवा, म्हणजे मी गोविंदास पुनः कधींही उपद्रव देणार नाहीं." या प्रमाणें त्यांनीं केलें, व गोविंदा बरा झाला.

जेव्हां पंचाक्षऱ्याच्या उपायांनीं गुण येत नाहीं तेव्हां शिरोळच्या दक्षणेस तीन मैलांवर दत्तात्रयाचें पवित्र स्थान जी नरसोबाची वाडी तेथें बाधा झालेल्या मनुष्यास पाठवितात. तेथें तो दररोज कृष्णेचें स्नान करितो, देवावर पाणी घालितो, गीता वगैरे कांहीं पवित्र पुस्तकें स्वतः वाचतो किंवा ऐकतो, आणि देवास प्रदक्षिणा घालितो. दुपारतीच्या वेळीं त्याच्या आंगांत येऊन चळवळ करूं लागतो, व इकडे तिकडे झोंके खाऊं लागतो. तेव्हां पिशाच बहुतेक त्यास सोडण्यास कबूल होतें, त्या बरोबर बाधिक मनुष्यास नदीवर नेऊन स्नान घालतात, आणि पिशाच त्यास सोडतें. कधीं कधीं भुतें लौकर सोडीत नाहींत. बाधिक मनुष्य नरसोबाच्या वाडीस देवाची सेवा करीत, कित्येक महिने राहतो. जे-

परिशिष्ट (ड)

भूतपिशाच बाधा.

